
उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
VEGETARIAN
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !





संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



सहल थंड प्रदेशाची

• थर्मल • स्वेटर्स • जर्किन • ग्लोज • सॉक्स • कॅप्स्
बरंच काही एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला • कापड बाजार, नं. 9422226599 • यशोदानगर, पाईपलाईन रोड,
• सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. २६.१२.२०२४ | अंक नं. २५० | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020


# ‘पे ॲण्ड पार्क’ योजना म्हणजे नगरकरांना लुटण्याचा ‘डाव’च

## बाजारपेठ, व्यापारी उध्वस्त होतील, निर्णय मागे घेण्याची महानगरपालिका आयुक्त, आमदारांकडे मागणी

नगर – मनपाने शहरातील मोक्याच्या ३५ रस्ते, जागांवर पे ॲण्ड पार्क योजना अंमलबजावणीची घोषणा केली आहे. यामध्ये शहराच्या मध्यवर्ती बाजारपेठेसह उपनगरातील प्रमुख रहदारीचे रस्ते, जागा यांचा समावेश आहे. त्याचबरोबर शहरातील मालमत्तां धारकांकडून सुधारित कर आकारणीचा देखील घाट घातला गेला आहे. प्रत्यक्षात नळाला दररोज स्वच्छ मुबलक पाणी येत नाही, रस्त्यांची दैनावस्था अजून संपलेली नाही, ७७८ रस्त्यांच्या कामांमध्ये बनावट टेस्ट रिपोर्टच्या आधारे सुमारे १५० कोटींहून अधिक रकमेचा स्कॅम झाला आहे, कचरा संकलनाचा बोजवारा उडालेला असून शहरात ठिकठिकाणी कचरा आहे, कोट्यावधी रुपये खर्च करून बसविण्यात आलेले पथदिवे अनेक ठिकाणी बंद पडलेले आहेत. नगरकरांना कोट्यावधींचा कर भरून देखील कोणतीही मूलभूत सुविधा मनपा देत नाही. असे असताना देखील पे ॲण्ड पार्किंग योजनेची घोषणा आणि प्रस्तावित अंमलबजावणी म्हणजे मनपाचा सामान्य नगरकरांना लूटण्याचा डाव आहे. या निर्णयामुळे बाजारपेठ, व्यापारी उध्वस्त होतील. मनपाने तात्काळ ही योजना मागे घेण्याची मागणी मनपा आयुक्त यशवंत डांगे, आ. संग्राम जगताप यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे शहर कॉंग्रेसच्या वतीने जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी केली आहे. मनपावर प्रशासकराज असले तरी देखील सत्तेचा रिमोट कंट्रोल शहरातल्या कोणत्या नेत्याच्या हातात आहे हे नगरकरांना माहिती असल्याचे देखील काळे यांनी म्हटले आहे.

महानगरपालिका प्रशासनाने खाजगी एजन्सीमार्फत सर्वेक्षण करून रस्त्यांलगत, महापालिकेच्या मोकळ्या जागेत पे ॲण्ड पार्कच्या नियोजनाचा प्रकल्प अहवाल तयार केला होता. त्याआधारे वसुली नियोजित केली जाणार आहे. त्यास आमचा कडाडून विरोध असल्याचे काळे यांनी म्हटले आहे.

### त्या घटकांना रस्त्यावर आणू नका

गाडगीळ पटांगणामध्ये पार्किंग प्रस्तावित करण्यात आले आहे. प्रत्यक्षात या ठिकाणी गेल्या अनेक वर्षांपासून हातावर पोट भरणारे भाजी विक्रेते आपला प्रामाणिकपणे व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. त्यांना तिथून हटवून पार्किंगचा ठेका आपल्या मर्जीतील बगलबच्चांना दिला जात आहे. प्रत्यक्षात या ठिकाणी अद्यावत असे भाजी मार्केट विकसित करायचे सोडून स्वयंरोजगार करणाऱ्यांना बेरोजगार करून देशोधडीला लावले जात आहे. ऐतिहासिक नेहरू मार्केट बुलडोझर लावून अनेक वर्षांपूर्वी जमिनदोस्त करण्यात आले. त्या जागी नवीन संकुल उभारणीचे आश्वासन देऊन धुळफेक केली गेली. प्रत्यक्षात आता त्या जागेवरील संकुलाचा प्रकल्प बासनात गुंडाळून पार्किंगसाठी जागा लाटली जात आहे. यामुळेच चितळे रोडवर गोरगरीब भाजी विक्रेते रस्त्यावर दुतर्फा बसून आपला उदरनिर्वाह करतात. एका बाजूला नेहरू मार्केट उभे राहू द्यायचे नाही, दुसऱ्या बाजूला अतिक्रमणाच्या नावाखाली गोरगरीब भाजी विक्रेत्यांना हूसकावून लावत उपासमारीच्या खाईत लोटायचे. प्रोफेसर कॉलनी चौकात चौपाटी विकसित झाली आहे. या माध्यमातून अनेकांनी स्वयंरोजगार मिळविला आहे. नगरकर नागरिक देखील मोठ्या संख्येने या चौपाटीवर रोज सायंकाळी खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत असतात. मात्र हा परिसर देखील मनपाने नो हॉकर्स झोन म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर येणार आहेत. खाद्य ग्राहकांची देखील गैरसोय होणार आहे. मध्यवर्ती बाजारपेठेत पूर्वीसारखा व्यापार राहिलेला नाही. त्यातही आता बाजारपेठेतील अनेक ठिकाणी सशुल्क पार्किंगमुळे ग्राहक पाठ फिरवतील. यामुळे बाजारपेठ, व्यापारी उध्वस्त होतील. हा तुघलकी कारभार मनपा व सत्ताधाऱ्यांनी तात्काळ बंद करावा, असा इशारा किरण काळे यांनी दिला आहे.

### त्या टेंडर आडून लुटण्याचा डाव

खासगी संस्थेने तयार केलेल्या प्रकल्प अहवालाला महासभेत मंजुरी मिळाल्यानंतर निविदा काढून शहरातील एका कार्यसम्राट नेत्याचा राजकीय वरदहस्त असणाऱ्या नाशिक येथील खासगी संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. या संस्थेला पे ॲण्ड पार्क वसुलीसाठी पाच वर्षांकरिता रु. २१.७५ लाखांना टेंडर देण्यात आले आहे. म्हणजे वर्षाला रु. ४.३५ लाख, प्रत्येक महिन्याला रु. ३६ हजार २५० तर प्रत्येक दिवसाकाठी रु. १ हजार २०९ एवढी अल्प रक्कम सदर संस्था मनपाला देणार आहे. दुचाकीसाठी एक तासा करिता मनपा या संस्थेच्या माध्यमातून नागरिकांकडून ५ रुपये आकारणार आहे. म्हणजे संपूर्ण शहरात ३६ ठिकाणच्या पार्किंग मधून प्रत्येक दिवशी केवळ २४२ दुचाकींचीच वसुली यामध्ये गृहीत धरली आहे. म्हणजे दर दिवशी सरासरी प्रत्येक ठिकाणी सहा ते सातच वाहनांच्या वसुलीतून एका दिवसाचे रु. १,२०९ संस्था वसूल करणार आहे. हा तर मनपाचा नगरकरांना खाजगी संस्थेच्या आडून लुटण्याचा डाव असल्याचा आरोप किरण काळे यांनी केला आहे.

### कार्यकर्त्यांना पोसण्यासाठी नगरकर वेठीस

मनपाने प्रस्तावित वसुली अत्यल्प रकमेची दाखवली असून धूळफेक करत नागरिकांकडून मात्र प्रत्यक्षात कोट्यावधी रुपयांची वसुली यातून केली जाणार आहे. सत्ताधारी हे आपल्या कार्यकर्त्यांना पोसण्यासाठी सर्वसामान्य नगरकरांना वेठीस धरत असल्याचा आरोप किरण काळे यांनी केला आहे. कार्यकर्त्यांना अशा गैरमार्गाने रोजगार देण्यापेक्षा कार्यकर्त्यांसह नगर शहरातील तरुण पिढीला कायमस्वरूपी शाश्वत सदमार्गाने रोजगार देण्यासाठी सरकार दरबारी आपले वजन खर्च करावे, असा टोला किरण काळे यांनी सत्ताधाऱ्यांना लगावला आहे.


आता आयुर्वेदिक उपचार घ्या
कॅशलेस
फक्त आपल्या "विश्वमंगल" मध्येच

• अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वप्रथम NABH मानांकित कॅशलेस आयुर्वेद हॉस्पिटल
• सर्व जुनाट विकारांकरिता आयुर्वेद व पंचकर्म उपचार
• विविध शस्त्रक्रिया टाळण्यासाठी विशेष उपचार
• सर्व आरोग्य विमा/हेल्थ इन्सुरन्स व्दारे कॅशलेस उपचार घेण्याची सुविधा
विश्वमंगल आयुर्वेद चिकित्सा केंद्र
पहिला मजला, आदर्श समृध्दी अपार्टमेंट, चौपटी कारंजा, अहिल्यानगर – ४१४००१
हेल्थलाईन – 92 90 900 900

कमी ऐकू येते का ?

signia Life sounds brilliant...
कंपनीचे अधिकृत विक्रेते
• न दिसणारे डिजीटल श्रवण यंत्र
• ३१ वर्षापासून सेवेत
• इंग्लडमधील अनुभव असलेले ऑडिओलॉजिस्ट
• लहान मुलांच्या तपासण्या
• स्पीच थेरपी
15% Discount
स्थापना : १९९२ साई हिअरिंग क्लिनिक
साई सर्जिकल ॲण्ड हिअरिंग सर्व्हिसेस
कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अहमदनगर.
मो. 83800 41240
वेळ : सकाळी १० ते सायं. ७ (रविवार बंद)

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

डॉक्टर / इंजिनियर व्हायचंय ?
Jha's Academy
पालक व विद्यार्थ्यांसाठी खास करियर काउंसलिंग प्रोग्रॅम
रविवार 29 डिसेंबर 2024
सकाळी 11 वाजता
हॉटेल संजयोग, मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.
7020354242 | 9689037633
jhasacademyahilyanagar


थंडीसाठी पौष्टीक –
आता चाणक्य चौकात सुद्धा...

गुळापासून बनवविलेले तिळ गजक, तिळ वडी, तिळ कतली, तिळ लाडू, तिळ पिस्ता गजक, ड्रायफ्रुट लाडू, मेथी लाडू, गाजर हलवा, मूंगदाळ हलवा.
Since 1910 बम्बईवाला मिठाईयाँ एवम् फरसाण
स्वीटस् । नमकीन । ड्रायफ्रुट । दिल्ली चाट । फास्टफुड
कापड बाजार, अ.नगर. | चाणक्य चौक, बुरूडगाव रोड, अ.नगर.
मो. : 9822041013 / 9623882710

वधू पाहिजेत
२२ ते ६० वय, सर्व समाज
विधवा, घटस्फोटीत जीवनाला कंटाळलेले पुनर्विवाह, रजिस्टर आताच करा.
पत्ता : माळीवाडा | डॉ. 9892911602

आता प्रत्येक शुक्रवार व शनिवार
मोफत तपासणी उपचार

नववर्षाच्या स्वागता निमित्त रुग्णांच्या व्याधी कमी करण्या करिता नोबल हॉस्पिटल परिवारातर्फे अनोखी आरोग्य योजना...
दर शुक्रवारी
मुत्रविकार व किडनीविकार तज्ञ, शल्यचिकित्सक
डॉ. अमेय सांगळे
(किडनी व मूत्रविकार तज्ञ)
MBBS, M.S. (General Surgery), Mch (Urosurgery)
यांची मोफत ओपीडी
दर शनिवारी
इतर विविध व्याधींवर उपचारा करीता खालील तज्ञ उपलब्ध
डॉ. राघव पारगांवकर (मेंदू व मणके विकार सर्जन) MS Gen. Surgery, Mch Neuro Surgery
डॉ. अद्वैत गिते (मेंदू विकार तज्ञ) MD Medicine (Neurology)
डॉ. सुशांत घुमरे (जॉईंट रिप्लेसमेंट सर्जन) MBBS, MS, (Ortho), DNB (Ortho), MNAMS
डॉ. प्रिती थोरात (नेत्रविकार तज्ञ) MBBS, DOMS, IOC
डॉ. यमिता साखरे-जाधव (किडनी विकार तज्ञ) MBBS, MD (Medicine), DNB Nephrology)

✲ अत्याधुनिक उपचार सुविधा ✲ हृदयरोग विभाग ✲ मेंदू विकार निदान व शस्त्रक्रिया विभाग ✲ किडनी व मूत्र विकार उपचार विभाग ✲ पोट व आतडे विकार आणि जनरल सर्जरी विभाग ✲ अस्थिरोग, जॉईंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया विभाग ✲ नेत्ररोग उपचार व शस्त्रक्रिया विभाग ✲ पुर्णवेळ अतिदक्षता विभाग तज्ञ उपलब्ध
नूतन वर्षाभिनंदन २०२५
अत्यंत अद्ययावत सेवा सुविधा
सर्व प्रमुख कंपन्यांसाठी कॅशलेस सुविधा
नगर जिल्ह्यातील सर्वप्रथम, प्रशस्त व परिपूर्ण आरोग्य मंदिर
एशियन नोबल हॉस्पिटल प्रा लि.
प्रेमदान चौक, मनमाड रोड, अहिल्यानगर
0241 - 2421290-91-92, 0241 - 2421911-12-13
मोफत उपचार अधिक माहितीसाठी संपर्क : 86055 52266


हिमालय, पारस, प्लास्टो व सिंटेक्स

या कंपन्यांचे १०० लिटर ते ५००० लिटर पर्यंतच्या टाक्या १० वर्षे गॅरंटीसह उपलब्ध..
मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पीटल शेजारी, सातभाई मळा, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर • पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
VARMORA KERAKOLL CARYSIL colortile RAK NIRALI BG TIMEX ICON
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
vaishnavitiles1@gmail.com

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## अहम् ब्रह्मासि...

मानवाचा संघर्ष हा अन्य कोणत्याही प्राण्याशी नाही. कारण त्यानं, जवळजवळ सर्व प्राणिसृष्टीवर विजय प्राप्त केला आहे. बाह्य वातावरण आणि परिस्थितीवर देखील त्याचा बराच अंकुश आहे. मग प्रश्न निमाण होतो की त्याचा कलह आहे कोणाशी? त्याचे शत्रू कोण आहेत? का त्याला जीवनाचा कलह कठीण भासतो आहे?


हा प्रश्न उपस्थित होण्याचं कारण असं की, मानवाचं जीवन त्रिमितीय आहे. तो स्वतःसाठी जगतो तसाच तो स्वतःच्या समाजासाठी म्हणजेच राष्ट्रासाठी जगतो आणि तिसरं तो त्याच्यातल्या (स्वतःच्या) परमतत्त्वासाठी जगतो.

प्रत्येकालाच स्वतःतल्या या परमतत्त्वाच्या अस्तित्वाची जाणीव असतेच असं नाही. पण स्वतःच्या अन् आपल्या समूहाच्या अस्तित्वाची निश्चितच असते.

या दोघांचं अस्तित्व टिकून राहावं म्हणून तो जे प्रयास करतो, तो त्याचा जीवनकलह असतो. जर मानवाला, परमतत्त्वाची जाणीव झाली आणि माझा देह म्हणजे मी नसून माझा आत्मा म्हणजे मी आहे हे जाणवलं. आणि तो आत्मा ब्रह्मस्वरूप असल्यानं त्याच्या अस्तित्वाच्या नष्ट होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हेही आकलन झालं तर कलहाचा प्रश्न नाही.

तात्पर्य, जदर आपल्याला कळलं की मी स्वतः ब्रह्मस्वरूप असल्याने नष्ट होणार नाही आणि हे कळण्या व पटण्याकरिता धर्मग्रंथ, अधिकारी वाणींचे वाचन, श्रवण जरुरीचे आहे. ही मानसिकता आचरणात आली तर जीवन सार्थकी लागेल.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



# वाहतुकीच्या नियोजनासाठी शहरात ३६ रस्ते आणि जागांवर 'पे अॅण्ड पार्क'

### १३ रस्त्यांवर पी १ - पी २ पार्कींग, १८ रस्त्यांवर नो पार्किंग - नो हॉकर्स झोन, महानगरपालिकेकडून खासगी संस्थेची नियुक्ती, लवकरच अंमलबजावणी

नगर - नगर शहरात वाहतूक नियोजन, पार्किंग व्यवस्था, एकेरी वाहतूक आदींचे नियोजन करत ३६ रस्ते व जागांवर 'पे अॅण्ड पार्क' मंजूर करण्यात आले आहे. यासाठी महानगरपालिकेने नाशिक येथील दिग्विजय एंटरप्रायजेस या खासगी संस्थेची नियुक्ती केली आहे. लवकरच याची अंमलबजावणी केली जाणार आहे. या माध्यमातून वाहतुकीची, पार्किंगची समस्या मार्गी लागेल, वाहतुकीला शिस्त येईल व महानगरपालिकेलाही उत्पन्न मिळेल, असा विश्वास आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी व्यक्त केला.

महानगरपालिका प्रशासनाने पार्कीझ मोबेलिटी प्रा.लि. या खाजगी एजन्सीमार्फत सर्वेक्षण करून नो पार्कींग झोन, नो हॉकर्स झोन, सम विषम सशुल्क पार्किंग, एकेरी वाहतूक, महापालिकेच्या मोकळ्या जागेत पे अँड पार्क आदींच्या नियोजनाचा प्रकल्प अहवाल तयार केला होता. यात १८ प्रमुख रस्त्यांवर नो पार्किंग व नो हॉकर्स झोन करण्यात आले आहेत. तर कापड बाजार व नवीपेठ रस्त्यावर एकेरी वाहतूक प्रस्तावित करण्यात आली आहे. खासगी संस्थेने तयार केलेल्या प्रकल्प अहवालाला महासभेत मंजुरी मिळाल्यानंतर निविदा काढून खासगी संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. शहर वाहतूक शाखेलाही सम विषम पार्किंग, नो पार्किंग झोनच्या अंमलबजावणीबाबत सूचना देण्यात येणार असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

शहरात लक्ष्मी भाऊराव पाटील विद्यालय, बेलदार गल्ली, चांद सुलताना विद्यालय समोरील रस्ता, गाडगीळ पटांगण, गांधी मैदान, मंगल गेट मटन मार्केट समोरील जागा, नेहरू मार्केट मोकळी जागा, वस्तू संग्रहालय, नोबल हॉस्पिटल लगतचा रस्ता, जुने सिव्हील हॉस्पिटल, लाल टाकीरस्ता अप्पू हत्ती चौक ते स्वास्थ्य हॉस्पिटल ते झेडपी क्वार्टरलगत, पोलिस लाईनलगत, बालिकाश्रम रस्ता नीलक्रांती चौक ते नायरा पेट्रोल पंप, सातभाई मळा, सावेडी जॉगिंग ट्रॅक १, सावेडी जॉगिंग ट्रॅक २, मिसगर विद्यालयमागे, वाडिया पार्क मधील दक्षिणेकडील



गेट जवळील जागा, एकविरा चौक ते पारिजात चौक रस्ता, इमारत कंपनी, अमरधाम पश्चिमेकडील कम्पौंड जवळील जागा, मानकर गल्ली, नीलक्रांती चौक ते चौपाटी कारंजा रस्ता, पांजरपोळ मोकळी जागा (मार्केटयार्ड चौक), पाईपलाईन रस्ता, पुणे बस स्थानकाजवळ, नेताजी सुभाषचंद्र चौक ते नवी पेठ शहर सहकारी बँकपर्यंत, कोठी रस्ता ते यश पलेस हॉटेल, भिस्तबाग चौक ते टीव्ही सेंटर हडको चौकापर्यंत, प्रोफेसर चौक ते प्रेमदान हॉटेल चौक, नवीन कलेक्टर ऑफिस रोड, सेंट आण्णा चर्च रोड, बंगाल चौकी, चायना मार्केट, सहकार सभागृह रोड, सावित्रीबाई फुले संकुल (आकाशवाणी केंद्राशेजारी) या ३६ ठिकाणी पे अँड पार्क करण्यात येणार आहे.

तसेच, भिस्तबाग चौक, एकविरा चौक, प्रोफेसर कॉलनी चौक, दिल्लीगेट चौक, चौपाटी कारंजा चौक, नेताजी सुभाषचंद्र चौक, तेलीखुंट लोकसेवा चौक, जुने जिल्हाधिकारी कार्यालय चौक, न्यू आर्टस् कॉलेज परिसर, भिंगारवाला चौक, जुने कोर्ट ते जिल्हाधिकारी कार्यालयपर्यंतचा रस्ता, झोपडी कॅन्टीन ते मिस्कीन मळा गंगा उद्यानपर्यंतचा रस्ता, पुणे बस स्थानक चौक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक (इम्पिरियल हॉटेल) चौक, विशाल गणपती मंदिर माळीवाडा चौक, मार्केटयार्ड चौक, तख्ती दरवाजा मशीद ते शनिचौक रस्त्याच्या दोन्ही बाजूला पार्किंग नाही, मार्केट यार्ड चौक ते सक्कर चौक रस्ता १८ ठिकाणी २५ मीटर क्षेत्रात नो पार्किंग व नो हॉकर्स झोन करण्यात आले आहे.

तर, संत दास गणुमहाराज पथ (कोर्ट गल्ली), पटवर्धन चौक ते शांतीबेन अपार्टमेंट (कोर्टाच्या इमारतीसमोर), घुमरेगल्लीतील तख्ती दरवाजा मस्जिद/संगम प्रिंटिंग प्रेस ते अमृत किराणा स्टोअर्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडवर, माळीवाडा वेस ते डॉ. आंबेडकर पुतळा, माळीवाडा वेस ते पंचपिर चावडी, पिंजारगल्ली, आडते बाजार, अनिल कुमार पोखर्णा (नारळवाले) पिंजारगल्ली कॉर्नर ते गदिया शॉप, शरद खतांचे दुकान आडते बाजार कॉर्नर ते कोंड्या मामा चौक, आयुर्वेद कॉलेज कॉर्नर ते माळीवाडा, रामचंद्र खुंट रस्ता ते ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय रस्त्यावर, श्री महाप्रभुजीमार्ग जुना कापडबाजार, संपूर्ण चितळे रस्ता (जुन्या सिव्हिलपासून) चौपाटी कारंजापर्यंत, दिल्ली गेट ते चौपाटी कारंजा, दाळ मंडई ते कापड बाजार रस्ता या ठिकाणी सशुल्क सम आणि विषम (पी १ - पी २) पार्किंग क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे.

पार्कींगसाठी आकारण्यात येणारे प्रतीतास शुल्क (जीएसटी अतिरिक्त) निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार दुचाकी - ५ रुपये, चारचाकी - १० रुपये, टेम्पो - २५ रुपये, मिनी बस - ५० रुपये, अवजड वाहने (ट्रक, बस, टुरिस्ट बस) - १२० रुपये, खासगी बस (१५ मीटर लांब) - १५० रुपये, पॅरा ट्रान्झिट नॉन डेझिग्नेटेड एरिया - १० रुपये असे शुल्क आकारण्यात येणार आहे. नो पार्किंग, नो हॉकर्स झोनमध्ये पार्कींग केल्यास दंडाची (जीएसटी अतिरिक्त) रक्कम निश्चित करण्यात आली आहे. दुचाकी (टोविंग) - ७४२ रुपये - दुचाकी (क्लँपिंग) - ५०० रुपये, चारचाकी (टोविंग) - ९८४ रुपये, चारचाकी (क्लँपिंग) - ७४२ रुपये आकारण्यात येणार आहेत.

# नगर-पुणे महामार्गावरील वाहतूकीत २ दिवस बदल

नगर - पुणे येथे होणाऱ्या जयस्तंभ कार्यक्रमानिमित्त वाहतूक कोंडी व अडथळा होऊ नये याकरिता पोलीस प्रशासनाने नगर पुणे महामार्गावर वाहतूक मार्गाचे नियोजन केले आहे अशी माहिती पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी दिली.

पुणे ग्रामीण जिल्ह्यातील लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हवेली तालुक्यातील मौजे पेरणे येथे१ जानेवारी २०२५ रोजी जयस्तंभ कार्यक्रम होणार असुन या जय स्तंभास अभिवादन करणे करीता मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होणार आहे. हा कार्यक्रम अ.नगर पुणे महामार्गालगत असुन कार्यक्रमाकरिता येणाऱ्या नागरीकांमुळे या महामार्गावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अ.नगर पुणे महामार्गावर प्रचंड प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असुन या महामार्गावरील वाहनाचा कार्यक्रमा करीता आलेल्या भाविकांना धक्का लागुन, अपघात होवुन कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या करीता ३१ डिसेंबर २०२४ रोजीचे ००.०१ ते २ जानेवारी २०२५ रोजीचे ६ वाजण्याचे दरम्यान अ.नगर पुणे महामार्गावरील बेलवंडी फाटा येथुन पुणे कडे जाणारी वाहतूक तसेच अ.नगरकडून सरळ पुण्याकडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहतूक मार्गामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्याचे नियोजित आहे.

अ.नगर पुणे महामार्गावरील बेलवंडी फाटा येथुन पुणे कडे जाणारे वाहतुकीसाठी मार्ग - बेलवंडी फाटा, देव दैठण, धावलगाव, पिंपरी कोळंडर, उक्कडगाव, बेलवंडी, अ.नगर, दौंड महामार्गावरुन लोणी व्यंकनाथ, मढे वडगाव, काष्टी, दौंड, सोलापूर पुणे महामार्गे पुण्याकडे अ.नगरकडून सरळ पुण्याकडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहतूकीकरीता पर्यायी मार्ग -२ कायनेटीक चौक / केडगाव बायपास, अरणगाव बायपास, कोळगाव, लोणी व्यंकनाथ, मढे वडगाव - काष्टी, दौंड, सोलापूर पुणे महामार्गे - पुण्याकडे अ.नगरकडून पुणे मार्गे मुंबई, नवी मुंबई, ठाणे कडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहतूकीकरीता पर्यायी मार्ग कल्याण बायपास आळेफाटा ओतूर माळशेज घाट मार्ग असा राहील

या आदेशाचे पालन करून नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक यांनी केले आहे.

# केडगाव मधून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

नगर - रात्री कुटुंबासह घरात झोपलेली १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी सकाळी घरात दिसुन आली नाही. तिच्या घरच्यांनी तिचा केडगाव परिसरात, तसेच नगर शहर, तिच्या मैत्रिणी व नातेवाईक यांच्याकडे चौकशी केली असता ती कोठेही मिळून आली नाही.

सदर मुलगी ही नगर मधील एका शाळेमध्ये इयत्ता बारावी मध्ये शिकत असल्याने तिच्या घरच्यांनी सर्वत्र तीचा शोध घेतला. परंतु ती मिळून आली नाही. सदर मुलीचे वर्णन उंची पाच फूट दोन इंच, वर्ण सावळा, शरीरबांधा पातळ, नाक सरळ, डोळे काळे असे आहे.

या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी बेपत्ता मुलीच्या पालकांनी दिलेल्या माहितीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाच्या गुन्ह्याची नोंद केली आहे. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक विकास काळे हे करीत आहे.

# नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्यांबरोबरच त्याचा वापर करणाऱ्यांवरही फौजदारी गुन्हे दाखल व्हावे

नगर - प्लॅस्टिक किंवा इतर कृत्रिम वस्तूपासून बनविलेल्या नायलॉन मांजा या नावाने परिचित असलेल्या धाग्यामुळे पक्षांना तसेच मानवी जिवितांस तीव्र इजा होण्याचा धोका असतो. हे कापलेले धागे पतंगांसोबत जमिनीवरच राहतात आणि ते जैवविघटनशील नसल्यामुळे मातीमध्ये मिसळतात. गटारे अडवणे, ड्रेनेज लाईन, नद्या, नाले यांसारखे नैसर्गिक पाण्याचे मार्ग, माती यावर विपरीत परिणाम होतात. पडलेले धागे कापून पडल्यामुळे गुरेढोरे, गायी आणि इतर प्राणी नायलॉनसह अन्नपदार्थ खातात. त्यामुळे राज्य सरकारने १९८६च्या पर्यावरण संरक्षण कायद्याच्या कलम ५ नुसार या मांजाची विक्री व वापरावर कायमस्वरुपी बंदी घातली आहे.

केवळ दंडात्मक कारवाई केल्याने घातक मांजा विक्री व वापर करणाऱ्यांवर जरब बसत नसल्याने संबंधितांवर इतरांच्या जीवितास धोका निर्माण केल्याने व पर्यावरणाचे नुकसान केल्याबाबत फौजदारी गुन्हे दाखल झाले पाहिजे. नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी घातक नायलॉन मांजा विक्री करताना आढळून आलेल्या आरोपींवर आता मोक्का तसेच तडीपारी अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश देत दोन जणांवर तशी कारवाई सुरू केली आहे. त्याप्रमाणे नगर जिल्ह्यातही आहे कारवाई होणे आवश्यक आहे

मांजा सापडेल ते ठिकाण सील करावं. अल्पवयीन मुलांकडे नायलॉन मांजा कुठून आणला याची माहिती लपवली तर पालकांवरही गुन्हा दाखल करावा, असे आदेश औरंगाबाद खंडपीठानं दिले आहेत. त्यानुसार ज्या ठिकाणी मांजाची विक्री व साठवणूक सापडेल त्यांच्यावर केवळ दंडात्मक कारवाया न करता ते ठिकाण सील करण्यात यावे व मांजाचा वापर करणाऱ्यांवर व वापर करणारे जर अल्पवयीन असतील तर त्यांच्या पालकांवर कारवाई होणे गरजेचे आहे.

# केडगाव परिसरात घराचे कुलूप तोडून भरदिवसा साहित्याची चोरी

नगर - घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून कोणीतरी अनोळखी महिलेने तिच्या साथीदारांसह आत प्रवेश करुन आतील १३ हजार ५०० रुपये किमतीचे साहित्य चोरुन नेले. ही घटना केडगाव परिसरातील सर्व्हे नंबर ४२२ मध्ये घडली.

या बाबतची माहिती अशी की बापू नाथा लोखंडे (रा. नवीन गावठाण, केडगाव) यांनी त्यांच्या नावे असलेल्या सर्वे नंबर ४२२ मधील प्लॉट नंबर ६५, ४६, ४६ चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या जागेवरील बांधलेले जुने घर मयूर राजेंद्र गुंड (रा.गुंड मळा, सोनेवाडी रोड, केडगाव) तसेच गणेश लक्ष्मण जाधव (रा. गजानननगर, केडगाव) या दोघांनी खरेदी केली. परंतु त्या घरात दोघांपैकी कोणी राहत नाही. ते घर मयूर गुंड व शुभम दळवी (रा.दूधसागर रोड, केडगाव) हे दोघे अभ्यासाकरिता वापरतात.

२३ डिसेंबर रोजी दुपारी एक अनोळखी महिला व तिच्यासह असलेले इतर पुरुष यांनी घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला व आतील दहा हजार रुपये किमतीचा एच पी कंपनीचा लॅपटॉप, दोन हजार रुपये किमतीचे फ्रिज, १ हजार रुपये किंमतीचे दोन लाकडी टेबल, पाचशे रुपये किमतीच्या प्लास्टिकच्या दोन खुर्च्या असे तेरा हजार पाचशे रुपये किमतीचे साहित्य चोरून नेले. हे सामान चोरुन नेताना तुकाराम रामदास कोतकर (रा. कोतकर मळा, सोनेवाडी रोड, केडगाव) यांनी पाहिल्याने त्यांनी राजेंद्र गुंड यांना फोन करून हा प्रकार सांगितला. त्यानंतर राजेंद्र गुंड व गणेश जाधव या दोघांनी घराच्या ठिकाणी जाऊन पाहिले असता घरातील साहित्य चोरीस गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी मयूर गुंड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अनोळखी महिला व इतरांविरुद्ध घरफोडीच्या गुन्ह्याची नोंद केली. अधिक तपास महिला सहाय्यक फौजदार अमिना शेख या करीत आहे.

# गावठी हातभट्टी दारु अड्ड्यांवर कारवाई, मुद्देमालासह २ ताब्यात

नगर - शहरासह उपनगरातून अवैध धंद्यांना ऊत आला असून गावठी हातभट्टीची दारू व मटका अड्ड्यावर शहर पोलिस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस कारवाई केली. तरीही शहरांमध्ये अवैध धंदे जोरात सुरू असल्याने पोलीस त्यावर सातत्याने कारवाई करीत आहेत. तोफखाना पोलीसांनी पेट्रोलिंग करत असताना सावेडी परिसरातील प्रेमदान चौकातील सोनी मंगल कार्यालयाजवळ तसेच तोफखाना येथील सिद्धेश्वर मंदिर जवळील सिद्धेश्वर तालीम लगत सुरू असलेल्या गावठी हातभट्टी दारु अड्ड्यावर छापा टाकून पाच हजार पाचशे रुपये किमतीचे गावठी हातभट्टी दारू जप्त करून दोघांना ताब्यात घेतले. ही कारवाई बुधवारी (दि. २५) केली.

## मंगल कार्यालयालगत दारुअड्डा

तोफखाना पोलीस सावेडी परिसरात पेट्रोलिंग गस्त करीत असताना त्यांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी प्रेमदान चौकातील सोनी मंगल कार्यालयाच्या भिंतीच्या आडोशाला सुरु असलेल्या गावठी हातभट्टी दारु अड्ड्यावर छापा टाकला असता तेथे उभा असलेला एक इसम पोलिसांना पाहताच पळून गेला. तेथे बसलेल्या एकास पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव शिवम अनिल झेंडे (वय २४ राहणार सिद्धार्थनगर सारडा कॉलेज मागे अ.नगर) असे सांगितले. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याकडील प्लास्टिकच्या ड्रम मध्ये व बादलीत तीन हजार पाचशे रुपये किमतीची ३५ लिटर गावठी हातभट्टी दारु मिळून आली. पोलिसांनी केमिकल तपासणी करिता थोडी दारु बाजूला काढून बाकीची दारू जागीच नष्ट केली. या कारवाईत शिवम झेंडे यास ताब्यात घेतले.

## मंदिराजवळ दारू अड्डा सुरु

दुसऱ्या कारवाईत तोफखाना पोलीस पेट्रोलिंग करीत असताना तोफखाना परिसरातील सिद्धेश्वर मंदिराजवळ असलेल्या सिद्धेश्वर तालमी लगत पत्राच्या टपरीच्या आडोशाला सुरू असलेल्या गावठी हातभट्टी दारू अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत एकास ताब्यात घेऊन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव गंगाराम हरिदास सगम (वय ५२, रा. दातरंगे मळा, नागुलवाडा, अ.नगर) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी टपरीची झडती घेतली असता टपरीत प्लास्टिकच्या गोणीत असलेली प्लास्टिकच्या पिशव्यात भरलेली (फुग्यात) दोन हजार रुपये किंमतीची गावठी हातभट्टीचे दारु मिळून आल्याने त्यातील १८० मिली केमिकल सॅम्पल करता घेऊन बाकीची दारू पोलिसांनी नष्ट केली. या कारवाईत गंगाराम सगम यास ताब्यात घेतले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये दोन वेगवेगळ्या गुन्ह्याची नोंद केली. पुढील कारवाई तोफखाना पोलीस करीत आहे. ही कारवाई पोलीस अंमलदार अहमद इनामदार, योगेश चव्हाण, भानुदास खेडकर, सतीश भवर, बाळासाहेब भापसे यांनी केली.

# शनि चौकातील मटका अड्ड्यावर छापा, मुद्देमालासह एक ताब्यात

नगर - कोतवाली पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर विनापरवाना बेकायदेशीररित्या लोकांकडून पैसे घेऊन कागदाच्या चिठ्ठ्यावर आकडे लिहून कल्याण मटका जुगार चालविणाऱ्या टपरीवर कोतवाली पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत एक हजार वीस रुपये रोख रक्कम व मटका जुगारीचे साधने असा मुद्देमाल जप्त केला ही कारवाई शनी चौक येथील मटक्याच्या टपरीवर केली.

याबाबतची माहिती अशी की शहर परिसरात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी गोमांस गोवंश जनावरे यासह नायलॉन मांजा मटका जुगार अड्ड्यावर छापा सत्र सुरू केले. या कारवाईमुळे शहरातील अवैध धंद्याबाबत नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात चर्चा होऊ लागले. स्थानिक गुन्हे आणि विशेष शाखेच्या पोलिसांना माहिती मिळते मग शहर पोलिसांना का मिळत नाही असाही प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत होता. यावरून शहरातील कोतवाली व तोफखाना पोलिसांनी अवैध धंद्यावर कारवाई सुरू केली.

कोतवाली पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या मटका अड्ड्याबाबत कोतवाली पोलीस अनभिज्ञ होते. मात्र कोतवाली पोलिसांनी अवैध धंद्यावर सुरू केलेल्या कारवाई दरम्यान शनी चौकात रस्त्याच्या कडेला पत्र्याच्या टपरीत एक इसम मटका जुगार चालवत असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली. पोलिसांना मिळालेल्या या माहितीवरून कोतवाली पोलीस पथकाने त्या ठिकाणी जाऊन छापा टाकला असता तेथे उभा असलेला एक इसम पोलिसांना पाहून पळून गेला. खाली बसलेल्या इसमास पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव गोरख भास्कर गाली (वय ४२, राहणार शिक्षक बँकेच्या पाठीमागे, लक्ष्मी कारंजा जवळ अ.नगर) असे सांगितले पोलिसांनी टपरीची झडती घेतली असता पोलिसांना एक हजार वीस रुपये रोख रक्कम व कल्याण मटका जुगार याचे साहित्य मिळून आले. पोलिसांनी मुद्देमालासह गोरख गाली यास ताब्यात घेतले.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सुरज कदम यांनी दिलेला फिर्यादीवरून गोरख गाली याच्या विरुद्ध मुंबई जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली पुढील कारवाई पोलिस हवालदार संदीप पितळे करीत आहे. ही कारवाई पोलीस अंमलदार संदीप पितळे, दीपक रोहकले, तानाजी पवार, सुजय हिवाळे, अनुप झाडबुके, संकेत धीवर आदींनी केली.

# जुन्या भांडणातून प्रेमदान हडको येथे तिघांना मारहाण

नगर - किरकोळ कारणावरून झालेल्या भांडणाची पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याचा राग येऊन तिघांनी पती-पत्नी व मुलास शिवीगाळ दमदाटी करीत लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. ही घटना सावेडी परिसरातील नवीन प्रेमदान हडको येथे बुधवारी (दि. २५) रात्री घडली.

याबाबतची माहिती अशी की येथील अरुणा मच्छिंद्र सानप (वय ४५, रा.नवीन प्रेमदान हडको, सावेडी) यांचा मुलगा रोहित याचे ओंकार प्रकाश ताटीकोंडा याच्याशी किरकोळ वाद झाले होते. ते वाद सानप कुटुंबीयांनी मिटविले होते. त्यानंतरही सानप कुटुंबीयांना ताटीकोंडा याने शिवीगाळ करून धमकी दिली होती याबाबत सानप यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली. दुपारी झालेल्या या घटनेमुळे ओमकार शंकर साठे, शैलेश पोपट कराळे, शुभम पोपट कराळे (सर्व रा. नवीन प्रेमदान हडको, सावेडी) यांनी सानप कुटुंबीयांना झालेल्या भांडणावरून शिवीगाळ करून दमदाटी केली. यावेळी सानप कुटुंबीय तुम्ही शिवीगाळ करू नका असे समजावून सांगत असताना, त्याचा राग येऊन तिघांनी त्यांना शिवीगाळ दमदाटी करीत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. यावेळी शुभम कराळे व शैलेश कराळे यांनी लाकडी दांडक्याने मारहाण केली. मच्छिंद्र सानप हे भांडण सोडविण्याकरिता मध्ये गेले असता ओम साठे याने त्यांना लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. तसेच त्यांच्या घरासमोर असलेल्या शाईन व ॲक्टिव्हा मोटारसायकलच्या काचा फोडून नुकसान केले. या भांडणात अरुणा सानप यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण तुटून गहाळ झाले. यावेळी तिघांनी सानप कुटुंबीयांना आम्ही गाड्या जाळून टाकू व रोहित याला जिवंत सोडणार नाही अशी धमकी देऊन तिथून निघून गेले.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अरुणा सानप यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ओम साठे, शैलेश कराळे, शुभम कराळे, यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१(२) (३), ३२४ (२) (६), ३ (५) अन्वये मारहाणीच्या गुन्ह्याची नोंद केली असून पुढील कारवाई तोफखाना पोलीस करीत आहे.

यु फोम, बाँडेड फोम, हिटलॉन फोम, फोम मॅट्रेसेस्, बेड बॅक, सोफा क्लॉथ, वेलवेट क्लॉथ, सोफा कव्हर्स, सोफा रनर पट्टी, नविन सोफा फ्रेमसह तयार करुन मिळेल, धुळी पासुन संरक्षणसाठी प्लास्टीक तयार पडदे
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# गृहिणी

## आरोग्य

### जाणून घ्या कांस्य मसाजचे फायदे

कांस्य मसाज ही एक प्राचीन भारतीय उपचार पद्धती आहे, ज्यामध्ये तांब्यापासून बनवलेल्या साधनांचा वापर करून पायांची मालिश केली जाते. ज्याचा उपयोग पायांच्या वेगवेगळ्या बिंदूंना दाबण्यासाठी आणि घासण्यासाठी केला जातो. कांस्य मसाज शरीराला शांत करते ज्यामुळे चांगली झोप येते.

## पाककला

### चॉकलेट केक

**साहित्य :** एक कप मैदा, एक कप पिठी साखर, अर्धा कप कोको पाउडर, अर्धा कप गरम पाणी, अर्धा कप थंड दूध, एक चमचा व्हॅनिला एसेंस, दोन चमचे दही, चिमूटभर ईनो, एक चमचा बेकिंग पाउडर अर्धा कप लोणी

**कृती :** केक बनवण्यापूर्वी सर्वात आधी ओव्हन १८० अंशांवर प्री-हीट करण्यासाठी ठेवावे. तसेच केक मेकरला तुपाने ग्रीस करावे. आता एका भांड्यात मैदा, साखर, कोका पावडर, बेकिंग पावडर आणि चिमूटभर मीठ घालून मिक्स करावे. एका भांड्यात अर्धा कप बटर आणि अर्धा कप गरम पाणी घालावे. व पिठात चांगले फेटून घ्यावे. यानंतर दूध आणि व्हॅनिला एसेंस घालून मिक्स करा. नंतर दही आणि बाकीचे सर्व साहित्य घालावे. आता केक मेकरमध्ये ठेवा आणि १६० अंशांवर ३५-४० मिनिटे बेक करावा. ४० मिनिट ठेवावे व चेक करून घ्यावे. आता केकमध्ये टूथपिक घाला, जर तो स्वच्छ बाहेर आला तर समजून घ्या की तुमचा केक तयार आहे.

## वास्तू

### दिवा येथे लावू नये

दक्षिण दिशेला कधीही दिवा लावू नका. असे म्हटले जाते की या दिशेला दिवा लावल्याने लक्ष्मी देवी कोपते. पण दक्षिण दिशेला दिवा लावल्यास हा दिवा यमराजापर्यंत पोहोचतो. दिवा लावला नाही तरी त्याची ज्योत दक्षिण दिशेला ठेवल्यास धनहानी होते. त्याचप्रमाणे घड्याळही दक्षिण बाजूस लावू नये.

## सल्ला

गर्भवती महिलांनी पपईच्या बिया खाणे टाळावे, कारण यामुळे गर्भपात होण्याचा धोका वाढू शकतो.

## सौंदर्य

मेंदी वापरल्याने तुमचे केस लांब होतात. त्यात मेथीचे दाणे मिसळून ते लावल्याने त्याचे फायदे लवकर दिसतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २७ डिसेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष कृष्णपक्ष, विशाखा २०|२९, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०६ वा. ०७ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय मिटेल.

**वृषभ** : व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल.

**मिथुन** : हितशत्रू त्रास देतील. दिवस कालच्या इतका आनंदात जाणार नाही. भाऊबंद डोके वर काढतील.

**कर्क** : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल.

**सिंह** : जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल. संततीसौख्य लाभेल.

**कन्या** : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही.

**तूळ** : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

**वृश्चिक** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**धनु** : रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल.

**मकर** : आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**कुंभ** : घरगुती बाबतीत अधीरता टाळाल. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आज आपल्या स्वतःच्या तर्कांना बळ मिळू शकेल.

**मीन** : सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता टाळा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मोलकरीण : बाईसाहेब तुमच्या मुलाने मच्छर खाल्ले,
बाईसाहेब : माझ तोंड काय बघतेस डॉक्टरला बोलाव,
मोलकरीण: आता घाबरण्याचे कारण नाही बाईसाहेब..
मी त्याला ऑल आऊट पाजले आहे.

# जागतिक आश्चर्ये

### *अलेक्झांड्रीया येथील दिपस्तंभ*

*अलेक्झांड्रीया येथील दिपस्तंभ हा प्रामुख्याने समुद्रात नौका नेणाऱ्या खलाशांसाठी बांधण्यात आला होता. या दिपस्तंभाच्या शिखरावर कायमच ज्वाला पेटत्या ठेवल्या जात. तसेच दिपस्तंभाच्या शिखरापर्यंत आरसे बसविण्यात आले होते.*

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## फिल्मीचक्कर क्र. ११६९ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | | | ■ | ■ |
| ■ | ■ | | ■ | ■ | ■ | ३ | ४ |
| ५ | | | | | ६ | ■ | |
| | ■ | | ■ | ■ | ७ | ८ | |
| ९ | | | ■ | १० | ■ | | ■ |
| | ■ | ■ | ■ | ११ | १२ | ■ | १३ |
| १४ | | | १५ | ■ | | ■ | |
| | ■ | ■ | १६ | | | | |

**आडवे शब्द :-** १) हृतिक रोशन, ऐश्वर्या रॉय यांचा एक चित्रपट ३) सावन++ (चित्रपटाचे नाव) ५) देव आनंद, हेमामालिनी यांचा एक चित्रपट ७) असली +++ (चित्रपटाचे नाव) ९) रंगीला +++ (चित्रपटाचे नाव) ११) ++मौजी (चित्रपटाचे नाव) १४) एक +++ + सपनोंका (चित्रपटाचे नाव) १६) राजकुमार, वहिदा रहेमान, मनोजकुमार, बलराज सहानी यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** २) जो जीता वही सिकंदर, लगान, गजनी आदी चित्रपटांचा नायक ४) एक फूल + ++ (चित्रपटाचे नाव) ५) +++ ++ + होते (चित्रपटाचे नाव) ६) राजू ++ गया जंटलमन (चित्रपट) ८) ऋषी कपूर, टीना मुनीम, सिमी गरेवाल, प्राण, प्रेमनाथ यांचा एक चित्रपट १०) ++ तेरी गंगा मैली (चित्रपटाचे नाव) १२) स्वर्ग +++ (चित्रपटाचे नाव) १३) प्रेमनाथ, मधुबाला, आगा यांचा एक चित्रपट १५) अनहोनी को ++ कर दे होनी को अनहोनी (गाणे)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : विजय हा मागून मिळत नसतो, तो धैर्याने झगडून मिळवावा लागतो.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## आरश्याचा वापर कधीपासून सुरू झाला?

आरसा हा आपल्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य घटक बनला आहे. आज प्रत्येक घरात एक तरी आरसा असतोच असतो. या आरशाचा शोध नेमका कधी लागला याबद्दल संशोधकांमध्ये दुमत आहे. आतापर्यंत असे सांगितले जात होते की सन १८३५ मध्ये जर्मन शास्त्रज्ञ जस्टस वॉन लिबिग यांनी आरशाचा शोध लावला होता.

त्यापूर्वी आरसा नावाची वस्तू अस्तित्वात नव्हती. लिबिग यांनी काचेवर मेटॅलिक सिल्व्हरचा थर देऊन जगातील पहिला आरसा तयार केला होता. परंतु काही संशोधकांचा असा दावा आहे की आरशाचा वापर तुर्कस्तानात सुमारे ८ हजार वर्षांपासून केला जात होता. सुरुवातीच्या काळातील हे आरसे ओब्सिडियन या धातूचा पातळ थर देऊन बनवले जात होते. प्राचीन मेक्सिकोमध्येही अशाच प्रकारे तयार केलेल्या आरशांचा वापर केला जात होता. सुरुवातीला आरशाची किंमत खूप जास्त असल्याने आरसे केवळ श्रीमंतांच्या घरांमध्ये असायचे.

गोरगरीबांना आरसा विकत घेणे परवडत नसे. त्याकाळी आरसा ही एक जादुई वस्तू आहे, असा लोकांचा समज होता. आरशामधून आपले पूर्वज आणि देवतांचे दर्शन घेता येते, असेही लोकांना वाटत असे. इसवी सन पूर्व तीन ते चार हजार वर्षांपूर्वी इजिप्त आणि इराकमध्ये तांब्याचा थर देऊन आरसे तयार केले जाऊ लागले होते.

## चोर आणि विहिर

एकदा राजा कृष्णदेवराय कारागृहाची पाहणी करण्यासाठी गेले असता, तेथे बंदिवान असलेल्या दोन चोरट्यांनी त्यांची दया मागितली. त्यांनी त्याला सांगितले की ते घरफोडीमध्ये निष्णांत आहेत आणि इतर चोरांना पकडण्यात ते राजाला मदत करू शकतात.


राजा एक दयाळू शासक असल्याने त्याने आपल्या रक्षकांना चोरांना सोडण्यास सांगितले. परंतु राजाने त्याआधी एक अट घातली. त्याने चोरट्यांना सांगितले की त्यांचा सल्लागार तेनाली रामनच्या घरात घुसून तेथून मौल्यवान वस्तू चोरू शकले तरच तो त्यांना सोडून देईल आणि हेर म्हणून त्यांची नियुक्त करेल. चोरांनी आव्हान स्वीकारले.

त्याच रात्री दोघे चोर तेनाली रामनच्या घरी गेले आणि काही झुडपांमागे लपले. रात्रीचे जेवण झाल्यावर तेनाली रामन बाहेर फिरायला आला, तेव्हा त्याला झुडपात काही खडखडाट ऐकू आला. त्यांच्या बागेत चोर शिरले आहेत हे लगेच त्याच्या लक्षात आले.

काही वेळाने तो आत गेला आणि त्याने आपल्या पत्नीला जोरात सांगितले की, मी दोन चोर पळून जाताना पहिले आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी लागेल. त्याने आपल्या पत्नीला सर्व सोन्या-चांदीची नाणी आणि दागिने एका ट्रकमध्ये ठेवण्यास सांगितले. तेनाली आणि त्याची पत्नी यांच्यातील संभाषण चोरट्यांनी ऐकले.

काही वेळाने त्यांनी घराच्या मागील बाजूस असलेल्या विहिरीपर्यंत ट्रंक ओढत नेली व विहिरीत फेकून दिली. चोरट्यांनी हा सर्व प्रकार पाहिला. तेनाली घरात गेल्यावर चोरटे विहिरीजवळ आले आणि त्यातून पाणी काढू लागले. रात्रभर ते पाणी काढत राहिले. जवळजवळ पहाटे ट्रंक बाहेर काढण्यात चोर यशस्वी झाले परंतु त्यात दगड पाहून त्यांना धक्का बसला. तेव्हा तेनाली बाहेर आला आणि रात्री चांगली झोपू दिल्याबद्दल आणि झाडांना पाणी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. तेनालीने आपल्याला फसवल्याचे दोन्ही चोरांच्या लक्षात आले. त्यांनी तेनालीची माफी मागितली आणि तेनालीने त्यांना जाऊ दिले.

तात्पर्य : बुद्धीचातुर्याने सर्व गोष्टी साध्य होतात.



# रहमते दर्शन (भाग - १)

## कृपासिंधू

उन्होंने हमारी बात सहानुभूतिपूर्वक सुनी और बोले, महाराज जी छत पर आराम कर रहे हैं, जब भी उनसे मुलाकात होगी, मैं आपके बारे में अर्ज़ करूँगा ।आप प्रतीक्षा करें। हमें कुछ आशा बँधी। हम पुरानी कोठी की सीढ़ियों के पास महाराज जी के आने की प्रतीक्षा करने लगे । कुछ ही देर में वह दया का ठाठें मारता समुद्र सीढ़ियों से उतर कर हमारी ही तरफ आ रहा था। हमने अपनी व्यथा महाराज जी के समक्ष रखी, तो महाराज जी ने कहा कि प्रसाद ले लो। हमने हाथ जोड़कर अर्ज की कि पहले हमारी अर्ज़ सुन लें। हमारी बात सुनकर सरल स्वभाव से सहज मुद्रा में फ़रमाने लगे, यदि डॉक्टर कहते हैं, तो ऑपरेशन करवा लो। हमने अर्ज़ की कि महाराज, दया करो ऑपरेशन की आवश्यकता न पड़े। महाराज जी प्रसाद दे कर आगे बढ़ गये। अब हमारी दूसरी घबराहट शुरू हुई कि कहीं गाड़ी न छूट जाये क्योंकि घर में बच्चे अकेले थे। हम गेट से बाहर निकले ही थे कि कोई भाई अपनी कार लेकर आये और हमारे पास कार रोक दी और बोले, आओ मैं तुम्हें छोड़ दूँ। इस प्रकार हम रात को घर पहुँचे।

अगले दिन जब अस्पताल पहुँचे तो पता चला कि जिस महिला डॉक्टर ने ऑपरेशन करना था, वह अमेरिका चली गई थी। हमें बताया गया कि अब ऑपरेशन अगले महीने होगा। पत्नी की हालत सुधरने लगी और महीना बीतते-बीतते वह बिल्कुल अच्छी हो गई और ऑपरेशन की आवश्यकता ही नहीं पड़ी। एक अन्य घटना मेरे साथ घटी कि मुझे पसळपर (दिल का दर्द) की तकलीफ हो गई। मैं एक नर्सिंग होम में इलाज के लिए गया तो केस की गम्भीरता को देखते हुए मुझे 'आपातकालीन वार्ड में रखा गया। अत्याधिक शारीरिक कष्ट के कारण मैं अचेत हो गया था। इस अचेतावस्था में मुझे अन्तर में एक ऐसा दृश्य दिखाई दिया कि एक पहाड़ की चोटी पर मैं एक जीप में बैठा हूँ और जीप नीचे लुढ़क जाती है। मैं घबरा जाता हूँ। उसी क्षण क्या देखता हूँ कि मेरे एक ओर दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी और दूसरी तरफ़ करुणा की जीवित और सार्थक मूर्ति माता हरभजन कौर जी विराजमान हैं। दर्शन करके मेरा भय दूर हो गया और मुझे अत्याधिक प्रसन्नता का अनुभव हुआ और मैं वास्तव में ऐसा अनुभव कर रहा था कि मेरा कोई भुगतान संत दर्शनसिंह जी महाराज ने कर दिया है।

इस प्रकार संत जन स्वप्नों, ख़्यालों आदि के ज़रिये भी अपने शिष्य के बुरे कर्मों का नाश कर देते हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

## दिमाग की शक्ती

योग निंद्रा अर्थात कार्य करते समय हम शिव बाबा (परमात्मा) को मन में देखते रहें या किसी और सकारात्मक चीज को देखते रहें या कोई सकारात्मक शब्द मन में रखें तो हम जागृत होते हुए भी नींद जैसा आराम महसूस करते रहते हैं। योग निंद्रा अर्थात शरीर के साथ साथ मन द्वारा अच्छे संकल्प करना । योग निंद्रा से लाभ

हम अनेकों पुरानी आदतों को बदल सकेगें, वहीं अनेको नई आदतों को अपना सकेंगे। गहरे स्तर पर हम नये विचारों को आकर्षितकर पाएगें। अधिक गहरे स्तर पर कार्य करके अनेको लाभ प्राप्त कर सकते हैं। जो लाभ हम जागृत अवस्था में प्राप्त नहीं कर सकते, योग निंद्रा से वह प्राप्त कर सकेगें। योग निंद्रा से शरीर और मस्तिष्क स्वस्थ रहता है। इस योग से नींद की कमी को पूरा कर जाता है। दूर सकते हैं। इस से थकान, तनाव व अवसाद भी आदते छूट जाती हैं। रक्तचाप, मधुमेह, हृदय रोग कमर दर्द, घुटनो, जोड़ो, सायटिका का दर्द ठीक हो जाता है। अनिद्रा और अवसाद में भी लाभ होता है।

दिमाग और योग निंद्रा

जब हम नींद में होते हैं तो हमारा चेतन मन सोचना अर्थात कार्य

होते हैं करना बंद कर देता है। हमारा अवचेतन मन नींद में भी कार्य करता रहता है। हमारे सारे आंतरिक अंग कार्य करते रहते हैं। जब हम जागृत तो चेतन और अवचेतन दोनो मन कार्य करते हैं। नींद में हमारा अवचेतन मन सिर्फ आंतरिक अंगो को चलाने के लिये सोचता है।

जागने के बाद अवचेतन मन और भी अच्छी बुरी बातें वर्तमान, भूत और भविष्य की सोचने लगता है। दुःख अशांति का कारण हमारा अवचेतन मन अर्थात आंतरिक मन है। चेतन मन से हम खाना बनाते हैं, चलते-फिरते या बोलते हैं। यह कार्य करते हुए हम मन में कुछ कुछ सोचते भी रहते हैं। यह कुछ कुछ अवचेतन मन सोचता है। हम जो कुछ कुछ सोचते रहते हैं यही दुःख का कारण हैं। हमारे दिमाग में एक ऐसा केन्द्र है, जैसे ही हम कोई व्यक्ति या वस्तु या किसी घटना के बारे में चेतन या अवचेतन मन से सोचते हैं, सोचते ही उस व्यक्ति या वस्तु से हमारा मन जुड़ जाता है और वहां से ऊर्जा लेने लगता है। प्रत्येक व्यक्ति कुछ कुछ सोचे बगैर रह नहीं सकता। बस हमें इस आंतरिक कुछ कुछ की सोच को अच्छी सोच में लगाना है। कुछ अच्छी चीजो को मन में देखते रहें या सोचते रहें तो हमें जागते हुए भी नींद जैसा आराम अनुभव होगा। आप २० घंटे कार्य करेंगें तब भी थकावट नहीं होगी। आप सदा फ्रेश रहेंगे। यही योग निंद्रा है। अगर हम शिव बाबा (परमात्मा) का ज्योति बिंदू रूप मन में देखते रहें तो हमें बहुत अच्छा अच्छा लगता रहेगा। इसी तरह आप आपने ईष्ट को, श्री कृष्ण को, श्री राम को, श्री हनुमान को, श्री गुरु नानक देव, ईसा मसीह को या किसी देवी को या देवता को देखते रहें तो आप को उनसे ऊर्जा मिलती रहेगी। जिस से आप को अपार शांति महसूस होगी। नींद जैसी सुखद अनुभूति होगी। अगर आप मन में किसी कमल के फूल, गुलाब के फूल या किसी और फूल को मन में देखते रहें तो आप को उस फूल से ऊर्जा मिलती रहेगी और आप को बहुत आराम महसूस होगा। अगर आप किसी वृक्ष खासतौर पर किसी

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

अशा पद्धतीने गर्भवतीने गर्भावस्थेत ही सर्व योगासने करावी. दैनंदिन कामामध्ये सुद्धा शरीराची हालचाल होऊन शरीराला योग्य व्यायाम मिळतो; म्हणून गर्भवतीने हलकी कामे करत राहावीत. योगासनांचा एखाद्या दिवशी कंटाळा आला तर त्या दिवशी सूक्ष्म क्रिया व प्राणायाम तरी करावा. ओझे उचलताना ओझे कमी प्रमाणातील असावे व दोन्ही हातांमध्ये समतोल घ्यावे. खाली वाकून एखादी वस्तू उचलायची असल्यास कंबरेत न वाकता गुडघ्यात वाकून उकिडवे बसून हातामध्ये वस्तू उचलावी. भाजी निवडणे, दळण करणे, जेवायला बसणे या क्रिया खुर्चीत न बसता मांडी घालून जमिनीवर बसून कराव्यात. या सर्व व्यायामप्रकारांमुळे गर्भवतीला शारीरिक व मानसिक स्वास्थ्य मिळेल आणि चांगले सर्वगुणसंपन्न बाळ जन्माला येईल यात शंकाच नाही. या काळात गर्भ गर्भाशयात स्थिर झालेला असतो. भावी मातेच्या शरीराला गर्भाची सवय झालेली असते; त्यामुळे या काळात उलटी, मळमळ होण्याचा त्रास कमी झालेला, अता गर्भवतीची भूक देखील वाढलेली असते; कारण गर्भ पूर्णपणे मातेच्या आहारावर अवलंबून असतो. त्याकरिता

## ३ ते ६ महिन्यांतील गर्भवतीचा आहार

मातेने सकस, ताजे, घरी बनविलेले शुद्ध, सात्त्विक असे अन्न घ्यावे. बाहेरचे रस्त्यावरचे, हॉटेलमधील पावभाजी, पाणीपुरी, शेवपुरी यांसारखे पदार्थ खाऊ नयेत, कारण पदार्थांसाठी वापरलेले पाणी अशुद्ध असते व तेल देखील चांगल्या प्रतीचे नसते. तसेच वापरलेला भाजीपाला धुतलेला नसतो. प्लेट्स, चमचे इ. अस्वच्छ असतात; त्यामुळे जंतुसंसर्ग होऊन गॅस्ट्रो, ताप असे आजार उद्भवू शकतात. त्याकरिता काही वेगळे खाण्याची इच्छा झाल्यास घरात किंवा नातेवाईकांकडे, मैत्रिणींकडे तो पदार्थ करून खावा. या तीन महिन्यांत गर्भात आकार वाढल्यामुळे त्याचा आतड्यावर ताण पडतो: त्यामुळे मलावस्तंभ, अपचन असे आजार गर्भवतीला होऊ शकतात; म्हणून रोजच्या जेवणात गायीचे तूप, दूध, पालेभाज्या, फळभाज्या - उदा. भोपळा, कोहळा, पडवळ, दोडके, घोसाळे, सिझनेबल फळे यांचा भरपूर वापर करावा. गव्हाच्या पीठाचा न चाळताच पोळ्यांसाठी वापर करावा. रक्तदाब नॉर्मल राहावा याकरिता अति मसाल्याचे पदार्थ, पापड, लोणची टाळावी. आपल्याकडे गर्भवतीने खाण्याच्या पदार्थांबद्दल काही गैरसमज आहेत. उदा. केळी, पपई, आंबा, अननस व भाज्यांमध्ये मेथी व कडधान्यामध्ये हुलगे खाल्ल्यास गर्भपात होतो. त्याकरिता हे पदार्थ खाऊ नयेत. हे काही अंशी बरोबर आहे; परंतु अतिप्रमाणात हे पदार्थ खाण्यात आले तरच त्रास उद्भवू शकतो. आंबा, पपई, अननस यांची एखादी फोड खाल्ल्यानंतर काही त्रास होत नाही. उलट आईला व बाळाला व्हिटॅमिन्स मिळतात, केळ्यामुळे बाळाचे वजन वाढते व कॅल्शिअम देखील मिळते.

चार महिन्यानंतर रोज एक केळ खाण्यास काहीच हरकत नसते. इडली, डोसा, ढोकळा हे आंबवलेले पदार्थ सुध्दा खूप चांगले असतात. यांच्यामधून व्हिटॅमिन ई मिळते. आठवड्यातून दोनदा तरी हे पदार्थ खाण्यात यावेत. आपण लहान मुलांना जसा खाऊचा डबा भरून देतो तसा गर्भवतीने सुद्धा छोटा खाऊचा डबा भरून घ्यावा.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# संस्कृती, परंपरा लहानपणी रुजविणे महत्वाचे

### माजी नगरसेवक मनोज कोतकर

नगर – परंपरा, संस्कृती लहान मुलांमध्ये रुजावी, यासाठी स्कुलच्यावतीने हे वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येत असतात. स्कुलच्यावतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी राबविण्यात येत असलेले उपक्रम कौतुकास्पद आहे, असे सांगून माजी नगरसेवक मनोज कोतकर यांनी लिटिल नर्सरी स्कुलचे कौतुक केले.

विठ्ठल..विठ्ठल... विठ्ठला... हरि ओम विठ्ठला..., विठ्ठल नामाची शाळा भरली... माऊली.. माऊली.. अशा विठ्ठलनामाने चिमुकल्यांनी सभागृहाचा परिसर दुमदुमून सोडला. निमित्त होते ते लिटिल स्कुलचे स्नेहसंमेलनाचे लहान लहान चिमुरडी हातात भगव्या पतका, टाळ, घेऊन सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे वृक्षवल्ली आम्हा सोयरी... या गाण्यातून वृक्षारोपण व वृक्ष संवर्धनाची घोषणा देऊन वृक्ष लागवडीचे महत्व पटवून देत होते.

केडगाव शास्त्रीनगर येथील लिटिल विंग्ज नर्सरी स्कुलचे स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन माजी नगरसेवक मनोज कोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव लोखंडे, हभप रामदास महाराज क्षिरसागर, जेष्ठ नागरिक विजय दळवी, कृष्णकांत साळुंके, नर्सरी स्कुलच्या प्राचार्य अनिता श्रीकांत लोखंडे आदि उपस्थित होते.



केडगाव शास्त्रीनगर येथील लिटिल विंग्ज नर्सरी स्कुलचे स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन मनोज कोतकर यांच्या हस्ते करण्यात आले.

## केडगाव येथील लिटील विंग्ज नर्सरी स्कुलचे स्नेहसंमेलन

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव लोखंडे म्हणाले कि संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभ्यासबरोबर भारतीय संस्कृतीचे ओळख व्हावी, यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. सण–उत्सवाच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये संस्कार रुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे. विद्यार्थ्यांना उपक्रमातून सण–उत्सवांची माहिती दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

हभप रामदास महाराज क्षीरसागर म्हणाले कि नर्सरी म्हटलं कि अगदी लहान लहान मुलं येथे प्रवेश घेत असतात परंतु या लहान मुलांना शिक्षणाबरोबरच आध्यत्मिक शिक्षण देणेही गरजेचे आहे म्हणजे त्यांच्यावर आतापासूनच संस्कार होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले

विजय दळवी यांनी प्रास्तविक केले. ते म्हणाले कि, केडगाव शास्त्रीनगर या भागात असलेल्या या लिटिल विंग्ज नर्सरी स्कुलची स्थापना दोन वर्षांपूर्वी झाली. या ठिकाणी केडगावच्या विविध भागातील मुलांना पालक घेऊन येत असतात. अगदी हसत खेळत शिक्षण, विविध खेळ, मनोरंजन आदी उपक्रमाच्या माध्यमातून मुले आनंद घेत असतात संस्थांचे पदाधिकारी हे वेळोवेळी योग्य नियोजन करत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य अनिता लोखंडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यार्थ्यांना पारितोषिकं देण्यात आली तसेच यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यावेळी शिक्षकवृंद व पालक उपस्थित होते.

# नगरमध्ये 'रिकामीक'ने रंगमंच गाजवला



ऊर्जा रंगभवन सभागृहात सादर झालेले 'रिकामीक' हे नाटक प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरले.

नगर – क्रिसमसच्या निमित्ताने नगरमधील नवीन तयार झालेल्या ऊर्जा रंगभवन सभागृहात सादर झालेले 'रिकामीक' हे नाटक प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरले. ऊर्जा गुरुकुल आणि आपलं घर यांच्या संयुक्त विद्यमाने सादर झालेल्या या नाटकाने प्रेक्षकांना भावनिक अनुभवाचा ठेवा दिला.

या नाटकाचे लेखन अमोल साळवे यांनी केले असून, दिग्दर्शनाची जबाबदारी मोनिका विजय यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे. नाटकात स्वराज अपूर्वा आणि मोनिका विजय यांच्या भावनापूर्ण आणि वास्तववादी अभिनयाने प्रयोगात जीव ओतला.

तांत्रिक बाजूसाठी सोहम दायमा यांनी प्रकाशयोजना केली, तर विनोद गरुड यांनी संगीत रचनेतून नाटकास साज चढवली. रंगमंच व्यवस्थापनात विशाल साठे, नितु सहानी, शर्वरी अवचट, योगेश गंजेवार आणि निरंजन केसकर यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. नाटकाचे पोस्टर डिझाईन व सोशल मीडिया व्यवस्थापन संकेत निकम आणि मयुरेश मोरे यांनी सांभाळले.

'रिकामीक' नाटकाचे नगरमध्ये यशस्वी सादरीकरण उभारण्यासाठी कल्याणी फिरोदिया यांचे मोलाचे योगदान लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे या नाटकासाठी एक दर्जेदार मंच उपलब्ध झाला.

हे नाटक यापूर्वी 'थेस्पो २६' या देशातील नावाजलेल्या फेस्टिवलमध्ये पृथ्वी थिएटर, मुंबई येथे सादर झाले होते. नगरच्या प्रेक्षकांसाठी हे नाटक एक खास पर्वणी ठरले.

कार्यक्रमाला नगरमधील ज्येष्ठ रंगकर्मी पी.डी. कुलकर्णी, गणेश लिमकर आणि चित्रकार अजय अपूर्वा यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. 'रिकामीक'च्या यशस्वी सादरीकरणाने नगरच्या रंगभूमीवर एक वेगळा ठसा उमटवला आहे.

### पुण्यात २८ डिसेंबरला पुढील सादरीकरण

नगरमध्ये मिळालेल्या यशानंतर 'रिकामीक'चा पुढील प्रयोग पुण्यातील सुदर्शन रंगमंच, पुणे येथे २८ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ आणि ७ वाजता सादर होणार आहे. पुण्यातील रंगप्रेमींसाठी ही एक अद्वितीय कलाकृती पाहण्याची संधी आहे.



सह्याद्री छावा संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी योगेश पांडुरंग वामन यांची नियुक्ती करण्यात आली.

# सह्याद्री छावा संघटनेच्या नगर जिल्हाध्यक्षपदी योगेश वामन

नगर – सह्याद्री छावा संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी योगेश पांडुरंग वामन यांची नियुक्ती करण्यात आली. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे पाटील यांनी वामन यांच्या नियुक्तीची घोषणा करुन त्यांना नियुक्तीपत्र दिले. यावेळी तालुकाध्यक्ष दत्ता वामन, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, सुभाष काकडे, सुभाष आल्हाट आदी उपस्थित होते.

योगेश वामन बांधकाम व्यावसायिक असून, विविध क्षेत्रात सामाजिक योगदान देत आहे. वंचितांचे प्रश्न सोडविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी प्रयत्नशील रहावे. समाजातील गोरगरीब, गरजू तसेच अडीअडचणीच्या वेळी सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती रावसाहेब काळे पाटील यांनी दिली.

# स्वावलंबन, सुसंस्कार आणि सकारात्मक दृष्टिकोन यशस्वी जीवनाची त्रिसूत्री

### उद्योजक एन. बी. धुमाळ

नगर – विद्यार्थ्यांनी शालेय संस्कार, परिश्रम व सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारत उत्तम यश संपादन करावे. वाचन, शिस्त आणि एकाग्रता यातून यशस्वी विद्यार्थी घडत असतो. स्वावलंबी आणि सुसंस्कारी बना, श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वांची जीवन चरित्रे अभ्यासा, असे प्रतिपादन उद्योजक व वक्ते एन. बी. धुमाळ यांनी केले.



महर्षी ग. ज. चितांबर विद्या मंदिरच्या वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग. ज. चितांबर विद्या मंदिरच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत अनेक उदाहरणांद्वारे त्यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी जीवनाचे मर्म सांगितले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव भाग्यश्री पाटील या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की मुलांनी कुठलाही न्यूनगंड न बाळगता प्रयत्नपूर्वक स्वतःला घडवावे. स्वतःतील क्षमतांचा जास्तीत जास्त उपयोग करून उत्तुंग यश संपादन करावे. यावेळी त्यांनी विविध न्यायालयीन संकल्पना सोप्या शब्दांत स्पष्ट करत विधी सेवा प्राधिकरणामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध समाजोपयोगी व विद्यार्थ्यांच्या हिताच्या योजनांची माहिती दिली.

यावेळी व्यासपीठावर नव विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, मानद सचिव निलेश वैकर, कार्यकारिणी सदस्य श्रीकांत चितांबर, विजय देवचक्के, प्रशालेच्या मुख्याध्यापिका विभावरी रोकडे, पर्यवेक्षिका मंदा शिंदे, संमेलन कार्यवाह अंजली हरिश्चंद्रे, शिक्षक प्रतिनिधी विनोद गाडगे, शिक्षकेतर प्रतिनिधी रोहिणी घबाडे तसेच शांता बोरा, सुनील कात्रे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक रेवण घंगाळे यांना मान्यवरांच्या हस्ते यावर्षीचा शिक्षण महर्षी ग. ज. चितांबर शिक्षण सेवा पुरस्कार देण्यात आला. रेवण घंगाळे यांनी सत्काराला उत्तर देताना शाळेप्रती व संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तलिखितांचे प्रकाशन करण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन त्यांचे कौतुक केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध गुणदर्शनपर कार्यक्रमांचे उपस्थितांनी कौतुक केले.

मानद सचिव निलेश वैकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. रवींद्र साताळकर यांनी शिक्षण सेवा पुरस्काराची माहिती दिली. मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांनी शालेय अहवाल सादर केला. प्रशांत कुलकर्णी व गणेश उघडे यांनी परिचय करून दिले. सचिन कोटमे व प्राजक्ता जोशी यांनी पारितोषिकांचे वाचन केले. विजय कुलकर्णी व योगिता चंद्रात्रे यांनी सूत्रसंचालन केले, संमेलन कार्यवाह अंजली हरिश्चंद्रे यांनी आभार मानले.

# केशवराव गाडीलकर व सखाराम मेहेत्रे विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

नगर – महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीच्या अभिनव बालवाडी, सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालय व केशवराव गाडीलकर हायस्कूलचे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ २३ डिसेंबर रोजी विद्यालयात उत्साहात झाले. अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी चंद्रकांत सोनार हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे सचिव नामदेवराव गाडीलकर ॲड. अंकुश गायकवाड होते. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले केशवराव गाडीलकर व सखाराम मेहेत्रे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व दीपप्रज्वलन करून झाली. प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका लतिका काळे व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गायकवाड यांनी शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या वर्षाचे अहवाल वाचन केले.



केशवराव गाडीलकर व सखाराम मेहेत्रे विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले.

अध्यक्ष भाषणामध्ये चंद्रकांत सोनार यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर अतिशय काळजीपूर्वक करावा कारण की इंटरनेटच्या काळामध्ये खूप सारी माहिती मोबाईलच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना मिळते. विविध स्पर्धा, शिष्यवृत्ती परीक्षा व विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर कसे राहता येईल याकडे अधिकाधिक लक्ष द्यावे. प्रतिकूल परिस्थितीतून जन्माला आलेल्या शाळेला आकार देणाऱ्या संस्थाचालकांचे भविष्याचा वेध घेणारे संस्थाचालक म्हणून त्यांचे कौतुक यावेळी सोनार यांनी केले. स्वर्गीय मंदाकिनी गाडीलकर धन्वंतरी उद्यान, गांडूळ खत प्रकल्प इत्यादी प्रकल्पांचे कौतुक केले. तसेच या सर्व स्वयंस्फूर्तीने राबवलेल्या उपक्रमांचे कौतुक करताना हिरवीगार सुंदर शाळा या शब्दात विद्यालयाला शाबासकी दिली.

संस्थेचे सचिव नामदेवराव गाडीलकर यांनी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालयांमध्ये सुरू असलेले विविध उपक्रम तसेच विद्यालयात, संस्थेला राज्य व केंद्र सरकारतर्फे मिळालेली पारितोषिके याची माहिती आपल्या भाषणात दिली. वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या विविध क्षेत्रातील बक्षिसांचे वितरण याप्रसंगी झाले. खेळ, नृत्य,निबंध, चित्रकला, तसेच आंतर शालेय व विभागासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक शैक्षणिक साहित्य मेडल स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन करण्यात आले, मागील वर्षी इयत्ता दहावी मध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय आलेले विद्यार्थ्यांना स्व.छबुबाई किसन बेलेकर, स्वर्गीय मंदाकिनी नामदेवराव गाडीलकर व स्वर्गीय केरूजी बापूजी शिंदे यांच्या स्मरणार्थ गौरव चिन्ह व रोख पारितोषिक पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले, तर पहिली ते दहावी मध्ये प्रथम आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना ॲड. स्व.सुरेश गायकवाड यांच्या स्मरणार्थ रोख बक्षीस देण्यात आले. दरवर्षी संस्थेच्या वतीने २८ नोव्हेंबर रोजी महात्मा फुले पुण्यतिथी निमित्त घेण्यात आलेल्या आंतर शालेय स्पर्धेचे बक्षीस वितरणही पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

सायंकाळी विविध गुणदर्शन कार्यक्रम सादर करण्यात आला त्यामध्ये बालवाडी ते दहावीपर्यंतच्या अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन देशभक्तीपर गीते समूहनृत्य, नाटिका सादर केल्या. दोन्हीही कार्यक्रमाच्या प्रसंगी अनेक पालक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुरेखा गर्जे तर उपस्थितांचे आभार सौ. मनीषा बोर्डे यांनी मानले.



पतित पावन संघटनेच्या अहिल्यानगर शहराच्या महिला उपनगर विभाग प्रमुखपदी वनिता निलेश बागडे यांना नियुक्तीचे पत्र शहराध्यक्ष गोरक्षनाथ सोनवणे यांनी प्रदान केले.

# पतित पावन संघटनेच्या महिला उपनगर विभाग प्रमुखपदी वनिता बागडे यांची निवड

नगर – पतित पावन संघटनेच्या अहिल्यानगर शहराच्या महिला उपनगर विभाग प्रमुखपदी वनिता निलेश बागडे यांना नियुक्तीचे पत्र शहराध्यक्ष गोर–क्षनाथ सोनवणे यांनी प्रदान केले. यावेळी उपाध्यक्ष परेश घुगरे, सचिव विराज अडगटला, कार्यकारी सदस्य राहुल रसाळ, महादेव गाडे, निलेश बागडे, शारदा बागडे, प्रतीक्षा रसाळ, मीना खडामकर, शोभा राऊत, विना ढेरे, सोनाली तांबे, उषा तांबे, वैशाली तांबे, उज्वला वाघ, मुक्ता तांबे, मीरा आठरे, यादव भाभी, रीमा यादव, गावडे आजी आदी उपस्थित होते.

गोरक्षनाथ सोनवणे म्हणाले, वनिता बागडे यांनी सामाजिक, धार्मिक, आणि शैक्षणिक कार्यातील योगदान यांची दखल घेऊन महिला उपनगर विभाग प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी देव देश धर्मासाठी कार्य करावे. तसेच समाजातील दीनदुबळ्या घटकांची सेवा व सामान्य ज्ञान देण्यासाठी प्रयत्न करावा.



आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक स्पोर्ट्स डे उत्साहात साजरा करण्यात आला.

# 'आयकॉन' स्कूलमध्ये स्पोर्टस डे उत्साहात

### विविध खेळात विद्यार्थ्यांनी दाखवले कौशल्य

नगर – आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक स्पोर्ट्स डे उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता ३ री ते इयत्ता १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारात सहभाग नोंदवत आपले कौशल्य आणि खेळातील नैपुण्य सिद्ध करून दाखवले. खिलाडूवृत्ती, संघ भावना तसेच नेतृत्वगुण संपूर्ण क्रीडा स्पर्धेत पहायला मिळाले.

कर्नल आर.सी. राणा यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेची मशाल प्रज्वलित करून दिवसाची सुरुवात झाली. जबाबदारीचे हस्तांतरण आणि कार्यक्रमाच्या प्रारंभाचे प्रतीक असलेली मशाल पदाधिकाऱ्यांच्या हाती देण्यात आली. शपथविधी समारंभानंतर मशाल प्रज्वलित करण्यात आली. सहभागींनी अत्यंत ताकदीने, लवचिकतेने आणि निष्पक्षतेने स्पर्धा खेळण्याचे वचन दिले.

विविध शर्यतींच्या उपांत्य फेरीसह, लांब उडी आणि शॉटपुट स्पर्धेतून अंतिम फेरीचा टप्पा निश्चित झाला. या वर्षीचे वैशिष्ट्य म्हणजे इयत्ता ३ री ते ५ वीच्या विद्यार्थ्यांचा मार्च पास्टचा. हा शाळेतील असा प्रकारचा पहिला उपक्रम होता. विद्यार्थ्यांनी सारे जहाँ से अच्छा च्या सुरांवर अभिमानाने कूच केली, ज्यात एकात्मता आणि राष्ट्रीय अभिमानाची भावना होती.

एथलेटिक्स, कवायती आणि मार्शल आर्टस्चा थरार अनुभवायला मिळाला. विद्यार्थ्यांनी तायक्वांदो, लेझिम, लाठी काठी मध्येही कौशल्य दाखवले.

पारंपारिक ढोल ताशाचे दोलायमान बीट शाळेच्या मैदानावर वाजले आणि कार्यक्रमाला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले.

सहभागी आणि प्रेक्षकांमध्ये ऊर्जा आणि उत्साह दिसून आला.

# महाराष्ट्राचा ५८ व्या निरंकारी संत समागमाच्या स्वेच्छा सेवांचा शुभारंभ

### पुण्याच्या धरतीवर होणार संत समागम

नगर – महाराष्ट्राच्या ५८व्या वार्षिक निरंकारी संत समागमाचे भव्य आयोजन सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि आ. निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन छत्रछायेमध्ये २४, ते २६ जानेवारी २०२५ रोजी मिलीटरी डेअरी फार्म ग्राउंड, पिंपरी पॉवर हाउस जवळ, पुणे–१७ येथील विशाल मैदानांवर आयोजित केला जात आहे. परमात्म्याची ओळख करुन मानवी जीवन दिव्य गुणांनी युक्त करत अनंताकडे विस्तारित करुन विश्वामध्ये सौहार्द व शांतीसुखाचे वातावरण निर्माण करणे हा या संत समागमाचा मुख्य उद्देश आहे.



५८व्या निरंकारी संत समागमाच्या स्वेच्छा सेवांचा शुभारंभ करताना संत निरंकारी मंडळाचे आ.मोहन छाब्रा, समवेत केंद्रीय अधिकारी, समागम समिती सदस्य, सेवादल अधिकारी आदी. (द्वारा– किशोर खूबचंदानी)

या भव्यदिव्य आध्यात्मिक आयोजनाची पूर्वतयारी करण्यासाठी स्वेच्छा सेवांचा विधिवत शुभारंभ संत निरंकारी मंडळाच्या प्रचार–प्रसार विभागाचे मेंबर इंचार्ज मोहन छाब्रा यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी संत निरंकारी मंडळाच्या वित्त व लेखा विभागाचे मेंबर इंचार्ज जोगिंदर मनचंदा, प्रचार प्रसार कॉर्डिनेटर (महाराष्ट्र) डॉ.दर्शन सिंह, समागम समितीचे चेअरमन शम्भुनाथ तिवारी, समन्वयक ताराचंद करमचंदानी आणि समागम समितिच्या अन्य सदस्यांसहित समस्त महाराष्ट्रातील सेवादल क्षेत्रीय संचालक उपस्थित होते. हजारो सेवादल स्वयंसेवकांसह महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून मोठ्या संख्येने आलेल्या भाविक भक्तगणांनी या समारोहामध्ये भाग घेतला.

स्वेच्छा सेवांच्या उद्‌घाटन प्रसंगी आपले भाव व्यक्त करताना मोहन छाब्राजी म्हणाले, की सतगुरुंच्या असीम कृपेने आयोजित होत असलेल्या या संत समागमामध्ये तोच सत्याचा संदेश दिला जाईल जो युगानुयुगे संत–महापुरुषांनी समस्त मानवतेला दिला.

ते पुढे म्हणाले, की संत निरंकारी मिशन मानवता व विश्वबंधुत्वाचे मिशन आहे. परमात्म्याचे ज्ञान प्राप्त केल्याने मानवा–मानवातील अंतर संपून जाते आणि एकमेकांशी प्रेमाचे नाते जोडले जाते. ज्यायोगे वैर, द्वेष, ईर्षा यांसारख्या दुर्भावना दूर होतात. ब्रह्मानुभूतिने आत्मानुभूति प्राप्त करुन मानवी गुणांनी युक्त होऊन धरतीसाठी वरदान बनेल असे जीवन जगणे हे मनुष्य जीवनाचे मुख्य लक्ष्य आहे.

उल्लेखनीय आहे, की महाराष्ट्रात वार्षिक निरंकारी संत समागमांची परंपरा फार जुनी आहे. १९६८ मध्ये महाराष्ट्राचा पहिला संत समागम मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर आयोजित करण्यात आला व त्यानंतर सतत ५२ संत समागम मुंबई महानगरातच होत आले. सन २०२० मध्ये ५३वा संत समागम नाशिकमध्ये झाला. ५६वा संत समागम छत्रपती संभाजीनगर येथे तर ५७वा संत समागम नागपुर नगरी येथे आयोजित करण्यात आला. यावर्षी हा ५८वा संत समागम आयोजित करण्याचे सौभाग्य विद्येचे माहेरघर पुणे नगरीला प्राप्त झाले आहे, ज्याचे साक्षी अवघे विश्व होईल.

हा दिव्य संत समागम सर्वार्थाने यशस्वी व्हावा यासाठी निरंकारी सेवादलाचे स्वयंसेवक आणि मोठ्या संख्येने अन्य निरंकारी भक्तगण मोठ्या तन्मयतेने समागम स्थळावर पूर्वतयारीसाठी आपल्या निष्काम सेवा अर्पण करत आहेत.



## नाताळ सणानिमित्त खा. निलेश लंके यांनी ख्रिस्ती बांधवांना दिल्या शुभेच्छा

नाताळ सणानिमित्त खा. निलेश लंके यांनी तारकपूर येथील सेंट सेव्हिअर चर्च येथे भेट देऊन ख्रिस्ती बांधवांना शुभेच्छा दिला. यावेळी यावेळी धर्मगुरू सतीश तोरणे, नगरसेवक योगीराज गाडे, शिवसेना उपप्रमुख जेम्स आल्हाट, लोकेश बर्वे व चर्च मधील सभासद उपस्थित होते.

# भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या शताब्दी वर्षानिमित्त शहरात २८ डिसेंबर रोजी स्नेह मेळाव्याचे आयोजन




नगर – भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या शताब्दी वर्ष देशभर साजरा होत असताना शहरात २८ डिसेंबर रोजी धर्मनिरपेक्ष पक्ष संघटनांच्या कार्यकर्त्यांचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला आहे. टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात सकाळी ११:३० वाजता होणाऱ्या या मेळाव्यात शोध पत्रकारिता करणारे ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले यांचे व्याख्यान होणार आहे. पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ.कॉ.भालचंद्र कानगो यांच्य अध्यक्षतेखाली होणाऱ्या मेळाव्यासाठी राज्य सचिव कॉ.ॲड. सुभाष लांडे, भाकपच्या राज्य सचिव मंडळ सदस्या कॉ. स्मिता पानसरे उपस्थित राहणार असून, भाकप, डावी आघाडी व समविचारी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

२६ डिसेंबर १९२५ रोजी कानपूर उत्तरप्रदेश येथे स्थापन झालेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे शताब्दी वर्ष सुरू होत आहे. त्यागाची, बलिदानाची व अविरत संघर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेला भारतीय कम्युनिस्ट पक्ष २६ डिसेंबर २०२४ रोजी ९९ वर्षे पूर्ण करून १०० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. या पार्श्वभूमीवर या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात पक्षातील ज्येष्ठांचा गौरव करण्यात येणार आहे.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी जिल्हा सेक्रेटरी कॉ.ॲड. बन्सी सातपुते, सह सचिव कॉ. सुधीर टोकेकर, कॉ. संतोष खोडदे, कॉ. संजय नांगरे, शहर सचिव कॉ. भैरवनाथ वाकळे, फिरोज शेख, भारती न्यालपेल्ली प्रयत्नशील आहेत.

# वस्तीगृहात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतःला कमी लेखू नये

### सुधीर लांडगे यांचे प्रतिपादन

नगर – वस्तीगृहात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतःला कमी लेखू नये. मी देखील चौदा वर्षे वस्तीगृहात शिक्षण घेतले आहे. त्यामुळेच मी इथपर्यंत पोहोचलो आहे. मी परमेश्वराचा आभारी आहे. काही झाडाचे बी कुंडीत पडले, शेतात पडले, काही बी डोंगरात पडले. जे बी कुंडीत पडले त्याला वेळच्या वेळेवर पाणी मिळाले. देखभाल केली गेली. जे डोंगरात पडले ते ऊन, वारा, पाऊस यांच्याशी संघर्ष करीत राहिले. परंतु काही काळानंतर कुंडीतील बी छोटेसे रोपटे झाले व डोंगरातील बी चे मोठ्या वटवृक्षात रुपांतर झाले. त्याप्रमाणेच वस्तीगृहातील विद्यार्थी आयुष्यात किती सुखदुःख येतील, चढउतार येतील त्यावेळेस तुम्ही सक्षमपणे उभे राहतील. चांगला अभ्यास करा, ध्येय ठेवून वाटचाल करा व शाळेच्या नावलौकिकात भर घालावी असे प्रतिपादन उद्योजक सुधीर लांडगे यांनी केले आहे.



दादा चौधरी विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभास प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक आदी.

## दादा चौधरी विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनातून व्यसनमुक्ती, मोबाईलचे दुष्परिणाम, अंधश्रद्धा या वाईट प्रवृत्तींवर प्रकाश टाकला. यावेळी रांगोळी, चित्रकला प्रदर्शन व वर्ग सजावट या दालनाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे सुधीर लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री. लांडगे यांनी शाळेतील शिक्षकांना पुस्तके भेट देऊन एक अनोखा उपक्रम केला. याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, सहाय्यक सचिव बाळासाहेब कुलकर्णी, दादा चौधरी विद्यालयचे शालेय समिती सदस्य संजय बोगावत, विजय गुंदेचा, विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक संजय मुदगल, मधुकर साबळे, कु.सुनीता जामगांवकर, दादा चौधरी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती जयश्री नन्नवरे, रामकरण सारडा वसतिगृहचे अधीक्षक बंडू भोसले, रिमांड होम वसतिगृह चे प्रतिनिधी तुलसीदास एक्कलदेवी, महात्मा फुले वसतिगृह प्रतिनिधी गणेश कोरडे, प्राथमिक चे मुख्याध्यापक सुभाष येवले, पार्वती बाई डहाणूकर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. रोहिणी फळे, अजय महाजन, दीपक शिंदे, भोसले सर, शिक्षक प्रतिनिधी प्रसाद सामलेटी, शिक्षकेतर प्रतिनिधी मनोज हिरणवाळे, विद्यार्थी प्रतिनिधी तेजस चव्हाण, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु.किर्ती मेढे आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रा.शिरीष मोडक म्हणाले, दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई यांनी राबविलेल्या विविध उपक्रमामुळे शाळेची प्रगती कौतुकास्पद आहे. स्नेहसंमेलनातून विद्यार्थी विविध प्रकारचे गुणदर्शन करीत असतात. काही मुले वक्तृत्व स्पर्धा, नाटिका, नृत्य सादर करतात. तसेच काही मुले विविध वेशभूषा करतात व मनोरंजन करतात. विविध स्पर्धेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक व गुणगौरव करणे हा प्रमुख उद्देशाने स्नेहसंमेलनाचा असतो. स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांसाठी एक पर्वणीच आहे.

अजित बोरा म्हणाले, ज्या स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेतला आहे व यश मिळविले आहे. त्यांचे अभिनंदन. स्पर्धेत यश मिळाले नाही तरी चालेल. परंतु प्रत्येक स्पर्धेत सहभागी घेण्याचा प्रयत्न करावा.

चित्रकला प्रदर्शन प्रसाद नंदे तर वर्ग सजावट प्रसाद सामलेटी यांनी केले. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका जयश्री नन्नवरे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले.

विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

अध्यक्षीय सूचना सौ. घोडे मॅडम यांनी मांडली. परिचय व स्वागत सौ.जयसुधा ताटी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा गुंडू यांनी केले तर आभार प्रसाद सामलेटी यांनी मानले.

# व्यवस्थापन आणि रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षणपर अभ्यासक्रम कोर्सचे उद्घाटन

### कौशल्य शिक्षण आत्मसात केल्याने विद्यार्थ्यांना व्यावसायिक क्षेत्रात संधी मिळतील : 'न्यू आर्टस् कॉलेज'चे प्राचार्य डॉ. बी.बी.सागडे

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, अहमदनगर (स्वायत्त) या ठिकाणी कौशल्य विकास कार्यक्रम ांतर्गत कार्यालयीन व्यवस्थापन आणि रोजगारक्षम कौशल्य या प्रशिक्षणपर अभ्यासक्रम कोर्सचे २३ डिसेंबर रोजी उद्घाटन पार पडले.



व्यवस्थापन आणि रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षणपर अभ्यासक्रम कोर्सचे न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये उद्घाटन झाले याप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्राचार्य प्राचार्य डॉ. बी.बी.सागडे आदी.

महाराष्ट्र शासनाच्या महाज्योती या स्वायत्त संस्थेमार्फत ग्रेस एज्युनेट व महास्किल टेक इनोव्हेटिव्ह फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कोर्स इतर मागास वर्ग, विमुक्त जाती–भटक्या जमाती तसेच विशेष मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण पदवी बरोबरच कार्यालयीन व्यवस्थापन आणि रोजगारक्षम कौशल्य यांचा विकास व्हावा याकरिता या कोर्सची रचना करण्यात आलेली आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.बी.सागडे हे होते. याप्रसंगी महास्किल टेकचे संचालक व सह संस्थापक राहुल बांगर, ग्रेस फाउंडेशनचे अभिजीत चिंतामणी, समन्वयक अजय बनसोडे महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के.एम.अंबाडे, डॉ. एस.बी.कळमकर, डॉ.ए.ई.आठरे व्याख्याते प्रा.गिरीश कुकरेजा व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.आशिष वाणी यांनी केले. डॉ. अतुल अडसुरे यांनी आभार मानले. इतर महाविद्यालयांनी सदर मोफत कोर्सेस सुरू करण्यासाठी संस्थेच्या ९०१११९३७०० या मोबाईल नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन समन्वयक अजय बनसोडे यांनी केले.



दिल्लीतील बेल्लामाँड हॉटेल मध्ये आयोजित ग्लोबल बिझनेस अवॉर्ड मध्ये अभिनेता सोनू सूद याची प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माउंट अबू येथून प्रकाशित होणाऱ्या ओम् शांति मीडिया चे संपादक राजयोगी बी के डॉ. गंगाधर यांनी भेट घेऊन त्यांना संस्थेच्या कार्याची माहिती दिली व संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय माउंट अबू ला भेटीचे निमंत्रण देऊन त्यांना प्रेरणादायी सूविचारांची फ्रेम भेट दिली. यावेळी बी के जया, बी के विकास व बी के डॉ. दिपक हरके उपस्थित होते.

# सेवाप्रीतच्या महिलांनी बालगृहातील मुलांसह साजरा केला ख्रिसमस

### आठरे पाटील बालगृहाला किराणा साहित्याची मदत

नगर – सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनने एमआयडीसी मधील आठरे पाटील बालगृहातील वंचित, निराधार बालकांसह ख्रिसमस सण साजरा केला. मुलांच्या भेटीला सांताक्लॉज आणून धमाल करण्यात आली. विविध मनोरंजनात्मक खेळ व सांस्कृतिक कार्यक्रमाने हा सोहळा रंगला होता. सेवाप्रीतच्या वतीने बालगृहातील विद्यार्थ्यांसाठी किराणा साहित्यासह अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

सांताक्लॉजने विद्यार्थ्यांना चॉकलेटची भेट देऊन मुलांसह केक कापला. विद्यार्थ्यांसह सेवाप्रीतच्या सदस्यांनी गाण्यावर ठेका धरला होता. या कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमाने बालगृहातील विद्यार्थ्यांचा ख्रिसमस सणाचा आनंद द्विगुणीत झाला होता. याप्रसंगी सेवाप्रीतच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, प्रकल्प प्रमुख गीता नय्यर, सोनाली ग्रोव्हर, रिया विजन, सविता धुप्पड, सोनिया कुंद्रा, मीनू बन्सल, पल्लवी शहा, आंचल कंत्रोड, अर्चना खंडेलवाल, अन्नू थापर, गीता माळवदे, कशीश जग्गी आदींसह ग्रुपच्या सदस्या व विद्यार्थी उपस्थित होते.




सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनने एमआयडीसी मधील आठरे पाटील बालगृहातील वंचित, निराधार बालकांसह ख्रिसमस सण साजरा केला.

जागृती ओबेरॉय म्हणाल्या की, जीवनात यश प्राप्त करण्यासाठी कोणावरही विसंबून राहू नये. जीवनात आपले अस्तित्व निर्माण करावे. शिक्षण घेऊन मोठे व्हावे. तर स्वतः यशस्वी झाल्यावर इतरांना देखील मदतीचा हात देऊन, इतरांचे जीवन प्रकाशमय करण्याचे त्यांनी आवाहन केले.

गीता नय्यर म्हणाल्या की, समाजात सण उत्सव साजरे होत असताना, वंचित घटकातील विद्यार्थी या आनंदापासून वंचित राहू नये. या उद्देशाने प्रत्येक धर्माचे सण–उत्सव सेवाप्रीतच्या माध्यमातून वंचित विद्यार्थ्यांसह साजरे केले जातात. तर उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी फाऊंडेशनच्या माध्यमातून सातत्याने सहकार्य करुन प्रोत्साहन दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

बालगृहाचे अध्यक्ष डॉ. अनिल आठरे यांनी सेवाप्रीतच्या माध्यमातून महिलांनी राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक केले.

बालगृहाच्या अधीक्षिका पुष्पांजली थोरात यांनी पाहुण्यांचे स्वागत करुन या उपक्रमाबद्दल आभार मानले.

या प्रकल्पासाठी मीनू बन्सल, निशा नारंग, शारदा मल्होत्रा, नितिका गुप्ता, रवीना आहुजा, निकिता पंजाबी, टीना इंगळे, संगीता मेघानी, दर्शना गुगळे, शितल वाघ, गिता मित्तल, मंजू ललवानी, सुमिता वाही, किरण खोसला, माधुरी सारडा, भावना नय्यर, दीपा नय्यर, सपना नय्यर, राजेंद्र जग्गी, सलोनी आहुजा, मोना आहुजा, सत्या वधवा, तृप्ती सराफ, प्रेरणा वधवा, करीना नवलानी, मुक्ता पंजवानी, पुनम कुमार, स्मिता अग्रवाल, निशा अरोरा, सुचिता घई आदींनी सहकार्य केले.



गुणे आयुर्वेदिक कॉलेज श्री दत्त महाराज मंदिर येथे श्रीमंत सद्गुरु शंकर महाराज मठ यांच्यावतीने ११ कुंडात्मक महादत्त याग सोहळा पार पडला.

# अध्यात्मिकतेतून चांगल्या कामाची ऊर्जा व प्रेरणा मिळत असते

### आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन

नगर – आपली भूमी ही संत महंतांच्या विचाराने व पदस्पर्शाने पावन झाली असून अध्यात्मिकतेचा मोठा वारसा आपल्याला लाभलेला आहे. त्याचे जतन होण्यासाठी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन होणे गरजेचे आहे केडगाव येथील श्रीमंत सद्गुरु शंकर महाराज मठ यांच्या वतीने भव्यदिव्य ११ कुंडात्मक महादत्त याग सोहळा झाला आहे. धार्मिकतेतून नेहमीच चांगल्या कामाची ऊर्जा व प्रेरणा मिळत असते आजच्या पिढीला संस्कृती व परंपरेची माहिती होणे गरजेचे असून आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मनुष्य चंद्रावर गेला असला तरी त्याला अध्यात्मिकतेची जोड असणे गरजेचे आहे त्यातून सुसंस्कृत पिढी निर्माण होईल. धार्मिक कार्यक्रमातून मनाला नेहमीच आनंद मिळत असतो असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले

गुणे आयुर्वेदिक कॉलेज श्री दत्त महाराज मंदिर येथे श्रीमंत सद्गुरु शंकर महाराज मठ यांच्या वतीने ११ कुंडात्मक महादत्त याग सोहळा झाला. यावेळी अरुण जगताप, पार्वतीताई जगताप, आ.संग्राम जगताप, अशोक महाराज जाधव, सचिन जगताप, शितलताई जगताप, सुवर्णाताई जगताप, अभिजीत खोसे, सुमित कुलकर्णी, इंजि. केतन क्षीरसागर, दिनेश जोशी, सिद्धार्थ जगताप, माऊली जाधव आदी उपस्थित होते.

# संताजी महाराजांच्या कार्याचा खऱ्या अर्थाने गौरव

### सौ. निता लोखंडे यांचे प्रतिपादन

नगर – सध्या संत संताजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अहिल्यानगरमध्ये तेली समाज मोठ्या प्रमाणात आहे. अहिल्यानगरच्या विविध क्षेत्रात कार्यरत राहून शहराच्या विकासात योगदान देत आहेत. विविध उपक्रमातून समाजाचे चांगले संघटन निर्माण झाले. समाजातील प्रत्येक घटकाची उन्नत्तीसाठी राबवित असलेल्या उपक्रमातून समाजोन्नत्तीचे काम होते. आता संताजी भवन येथील 'श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर' अशा डिजिटल कमानीचे उद्घाटनाने यातून संत संताजी महाराजांच्या कार्याचा खऱ्या अर्थाने गौरव होणार आहे. प्रत्येक समाजातील संतांनी समाजाला दिशा दिली आहे, असा विश्वास तिळवण तेली समाज ट्रस्टच्या अध्यक्षा सौ. नीता लोखंडे यांनी केला आहे .



तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने 'श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर' अशा डिजिटल कमानीचे उद्घाटन अध्यक्षा सौ. निता लोखंडे यांच्या हस्ते झाले.

## तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने मंदिराच्या नविन डिजिटल कमानीचे उद्घाटन

तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने मंदिरच्या नवीन डिजिटल कमानीचे उद्घाटन सौ. निता लोखंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपाध्यक्षा सौ. शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर, खजिनदार प्रकाश सैंदर, विश्वस्त प्रसाद शिंदे, मनोज क्षीरसागर, सागर काळे, गोकूळ कोटकर, दत्तात्रय डोळसे, ह.भ.प. रामदास महाराज क्षीरसागर, उद्योजक रमेश साळुंके, प्रमोद डोळसे, बाळासाहेब जुंदरे, वैभव शिंदे, योगेश भागवत, ओंकार लोखंडे, नंदू गुरसाळे, गणेश धारक व समाज बांधव उपस्थित होते.

याप्रसंगी उद्योजक रमेश साळुंके म्हणाले, कि आज डिजिटल कमानीचे उद्घाटन ही सर्वांसाठी आनंदायी बाब आहे. समाजाच्या एकत्रित प्रयत्नाचे हे यश आहे. तिळवण तेली ट्रस्टच्या माध्यमातून समाजाच्या उन्नत्तीसाठी विविध उपक्रम राबविले जात आहे, त्याचा मोठा फायदा होत आहे. असे ते म्हणाले

याप्रसंगी हभप रामदास महाराज क्षीरसागर यांनीही मनोगतातून तिळवण तेली समाज ट्रस्टच्या कार्यचा गौरव केला त्यांच्या कार्यातून सर्वांना कायम प्रेरणा मिळेल असे सांगितले.

यावेळी डिजिटल कमान तयार करणारे बाळासाहेब जुंदरे यांचा ट्रस्टच्यावतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास कृष्णाबाई सैंदर, कमलाबाई नागले, चंदा म्हस्के, सुरेखा सैंदर, विमल वराडे, वृषाली अडगटला, निशा तरटे, गोदाबाई दिवटे, पुष्पा घोडके, अहिल्या कोदे, सत्यभामा शेरकर, पद्मा पाथरकर, स्वाती शेंडगे, लीला शिंदे, आसराबाई सोनवणे, पुष्पां रासकर, शशिकला काशीद, रत्नमाला गुरसाळे, मीराबाई काशीद, गोयल आदी उपस्थित होत्या

प्रास्तविकात उपाध्यक्षा शोभना धारक यांनी ट्रस्टच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन मनोज क्षीरसागर यांनी केले तर आभार शशिकांत देवकर यांनी मानले.

# अंतरंग बदलले तरच व्यक्तिमत्व बदलते

## प्रवीणऋषीजी म.सा.



अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवर श्री प्रविणऋषीजी म.सा., मधुर गायक श्री तीर्थेशऋषिजी म.सा यांच्या पावन सानिध्यात विविध शिबीरांचा प्रारंभ झाला. याप्रसंगी उपस्थित असलेले साधक-साधिका.

नगर – अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवर श्री प्रविणऋषीजी म.सा., मधुर गायक श्री तीर्थेशऋषिजी म.सा यांच्या पावन सानिध्यात विविध शिबीरांचा प्रारंभ झाला असुन १८ डिसेंबर पासून चालू झालेल्या या शिबीरात देश-विदेशातून साधक आनंद तीर्थ, चिंचोडी येथे येत आहेत. प्रवीणऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने संपूर्ण देशभरात अष्टमंगल, गर्भसंस्कार, ब्लीसफुल कपल, कर्मा मृत्युंजय, पुरुषाकार अशा प्रकारचे विविध शिबीराचे उपक्रम राबविण्यात येतात.

जीवनात सुविधा आणि साधन यांची रेलचेल असते परंतु यांनी जीवन बदलत नाही. अंतरंग बदलले तरच व्यक्तिमत्व बदलते आणि याच तत्वाला जीवनात उतरवण्यासाठी या साधना शिबिरांचे आयोजन होत असते.

हे साधक सहा महिन्यांचे विशेष प्रशिक्षण घेउन उत्तीर्ण झाल्यानंतर या सर्टिफिकेशन कार्यक्रमासाठी आनंदतीर्थ चिचोंडी इथे येतात. या साधना व्यक्तिचे जीवन परिपूर्ण, स्वस्थ्य, आनंदी राहण्यास मदत करतात

साधक ७२ तास एकाच ठिकाणी ध्यान साधना करीत आपल्या शरीरात, व्यक्तिमत्वात परिवर्तन करतात. या ट्रेनर साधकांच्या माध्यमातुन समाजात, परिवारात नितीमुल्याचे शिक्षणासोबत महावीरांच्या संदेशाची आवश्यकता यावर विशेष भर गुरुदेव आपल्या प्रवचनातुन देत आहेत.

देशभरात जवळपास १० हजारपेक्षा अधिक साधक व ५०० पेक्षा अधिक ट्रेनर त्यांच्या मार्गदर्शनातून काम करीत आहे सर्वांनी अगोदर ऑनलाईन ट्रेनिंग दिले जाते आणि ट्रेनिंग परिक्षण घेतल्यानंतर त्यांना सर्टिफिकेट दिले जाते. अशा सर्टिफिकेट वितरणाचा कार्यक्रम २५ डिसेंबर रोजी आनंदतीर्थ येथे झाला.

सर्टिफिकेशन कार्यक्रम प्रसंगी जिनशासन गौरव सुनंदाजी म.सा आदी ठाणा ६ यांच्या पावन उपस्थितीत व गुरु आनंद फाऊंडेशनचे अध्यक्ष सतीष सुराणा, ट्रस्टी सुभाष मुथा, अशोक पितळे, विलास कटारीया यांच्या हस्ते झाला. सदर शिबिराच्या आयोजन नियोजनासाठी अर्हम विज्या फाऊंडेशनचे वरिष्ठ ट्रेनर्स तसेच आनंद तीर्थ समितीचे संजय गुगळे, सम्यक गांधी, बाळु चोपडा यांच्यासह चिचोंडी श्रावक संघाचे कार्यकर्ते, पदाधिकारी व गुरुभक्त परिमश्रम घेत आहे.

१२ जानेवारी पर्यंत ही शिबीरे चिचोंडी आनंदतीर्थ येथे संपन्न होणार असल्याची माहीती श्री गुरु आनंद फाऊंडेशनतर्फे दिली आहे.

# रसिकांना शनिवारी मिळणार सुमधूर हिंदी गीतांची मेजवानी

## ५ पैठणी, स्मार्ट वॉच जिंकण्याचीही संधी




नगर – सरत्या वर्षात संगीत रसिकांना जुन्या-नव्या समधूर हिंदी गितांची मेजवाणी मिळणार आहे. येथील स्वरात्मिक ग्रूपने हॅप्पी बिटस् हा समधूर गीतांचा कार्यक्रम शनिवारी (दि. २८) सायंकाळी साडेपाच वाजता माऊली सभागृहात आयोजित केला आहे. सर्वांसाठी मोफत असलेल्या या कार्यक्रमात भाग्यवान रसिकांना पैठणी, स्मार्ट वॉच, हेडपोन आदी बक्षिसेही जिंकता येणार आहे.

नगरमध्ये कार्यरत असणाऱ्या स्वरात्मिक या ग्रूपच्या माध्यमातून व इंजि. अभिजीत गायकवाड यांच्या पुढाकारातून साकारलेल्या या कार्यक्रमात ११ गायक जुन्या व नव्या हिंदी गाण्यांचे सादरीकरण करणार आहे. अभिजीत गायकवाड, निलेश महाजन, महेश घावटे, विद्या तन्वर, पुनम कदम, अनिल खंडागळे, पूजा गडकरी, श्रद्धा गायकवाड, नरेश बडेकर, मोनाली बोरूडे आदी कलाकारांबरोबरच विशेष अतिथी म्हणून डॉ. दमन काशिद कार्यक्रमात गिते सादर करतील. पुणे येथील निराली मंकड कार्यक्रमाचे निवेदन करणार आहे.

कार्यक्रमास उपस्थित असलेल्या १० भाग्यवान रसिकांना ५ येवला पैठणी व इतर ५ बक्षिसे देण्यात येणार आहे. त्यासाठी सन्मानिका आवश्यक असतील. मोफत सन्मानिका मिळण्यासाठी ९५०३०३०९५० व ७३५०८८१५१५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमास नानासाहेब भवर, भाऊ गारडे, मनिष शिंदे, डॉ. दमन काशिद, महेश घावटे, विशाल लाहोटी, विकास सांगळे, अतुल बाचकर, अशोक मासाळ, विनोद फुगारे यांनी सहकार्य केले.

# श्रीरामपूर मर्चंट असोसिएशनच्या निवडणुकीत स्वप्निल चोरडीया, नंदकुमार कोठारी, संदीप अग्रवाल, योगेश ओझा, दत्तात्रय ढालपे विजयी

श्रीरामपूर – येथील श्रीरामपूर मर्चंटस् असोसिएशन या व्यापारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या पाच जागेसाठी २५ डिसेंबर रोजी झालेल्या चुरशीच्या निवडणुकीमध्ये स्वप्निल अनिल चोरडीया ३१५, नंदकुमार पुनमचंद कोठारी ३१४, संदीप अशोक अग्रवाल २९३, योगेश जयप्रकाश ओझा २८७ व दत्तात्रय ढालपे २७४ मतांनी विजयी झाले आहेत. प्रतिस्पर्धी उमेदवार जयप्रकाश तिरथदास मिलाणी २६०, वैभव रमणलाल गुजराणी २५२, प्रविण संपतलाल बोरा १६३ व बाळासाहेब विठ्ठल ढेरंगे हे १४२ मते पडून पराभूत झाले.

निवडणुकीत ५०० सभासद मतदारांपैकी ४६५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. सुहास हिरालाल चुडीवाल यांनी काम पाहिले. तर त्यांना गौतम उपाध्ये, संजय कासलीवाल, बन्सी फेरवाणी, नारायणराव कर्डीले, चाबुकस्वार रमेश फकीरा, संस्थेचे कर्मचारी किरण खंडागळे आदींनी सहकार्य केले होते.

निवडणूक निकालानंतर विजयी ५ उमेदवारांच्या समर्थकांनी हार घालून गुलाल खेळून आनंदोत्सव साजरा केला.

निवडणूक निकालानंतर निवडणूक अधिकारी ॲड. सुहास चुडीवाल यांनी नूतन संचालकांचे अभिनंदन करून निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी व्यापारी सभासदांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.



किरण पवार टेबल टेनिस ॲकॅडमी आयोजित जिल्हास्तरीय टेबल टेनिस शिबिराचे उद्घाटन अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सेक्रेटरी यशवंत बापट सर यांच्या हस्ते झाले.

# किरण पवार ॲकॅडमी आयोजित टेबल टेनिस शिबिराचे उद्घाटन

नगर – २५ ते ३१ डिसेंबर दरम्यान किरण पवार टेबल टेनिस ॲकॅडमी आयोजित देवांग गुजराती स्मरणार्थ जिल्हा-स्तरीय टेबल टेनिस शिबिराचे उद्घाटन अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सेक्रेटरी यशवंत बापट सर यांच्या हस्ते झाले. यावेळी दंतचिकित्सक डॉ. सचिन बुधवंत, राजेंद्र गुजराथी, के. पी. टेबल टेनिस ॲकॅडमीच्या संचालिका सौ. निवेदिता पवार उपस्थित होते. या शिबिरात एकूण ६० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या शिबिरात खेळाडूंच्या शारीरिक मानसिक विकासाबरोबरच आहार, मेडिटेशन, योगा यावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

यशवंत बापट सरांनी अनमोल असे मार्गदर्शन खेळाडूंना केले. मुलांनी अभ्यासाबरोबरच खेळही खेळणे गरजेचे आहे. खेळामुळे मुलांना ऊर्जा मिळते. अभ्यासातील एकाग्रता वाढते मुलांनी सुट्टीचा सदुपयोग करून खेळाचे ज्ञान आत्मसात करावे.

डॉ. सचिन बुधवंत सरांनी आपल्या भाषणात के. पी. टेबल टेनिस ॲकॅडमी एक चांगला उपक्रम राबवून देवांगची आठवण योग्य प्रकारे जपण्याचा प्रयत्न करत आहे. खेळ व आरोग्यविषयक माहिती मुलांना सांगितली.

राजेंद्र गुजराती सरांनी देवांगचे टेबल टेनिस विषयीचे प्रेम तसेच के.पी. कडमी अनेक वर्षांपासून देवांगच्या स्मरणार्थ मोफत जिल्हास्तरीय स्पर्धा व शिबिरे घेतल्याने जिल्ह्यातील खेळाडूंना लाभ होत आहे.

या शिबिरात खेळाडूंना एन. आय. एस. टेबल टेनिस मार्गदर्शक राष्ट्रीय ब्राँझ पदक विजेते क्रीडा व योगशिक्षक किरण पवार सर यांचे मार्गदर्शन मिळत आहे. या शिबिरासाठी राष्ट्रीय खेळाडू साक्षी पवार, शशिकांत डव्हारे, प्रेम भोसले, ऋषभ पुंड, अभिजीत ससाने, उमेश डोळस इ. खेळाडू मेहनत घेत आहेत. सौ. निवेदिता पवार यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

## घरासमोरुन मारुती कारची चोरी

नगर – घरासमोर रस्त्याच्या कडेला लॉक करून लावलेली ८० हजार रुपये किमतीची मारुती कंपनीची इको चार चाकी गाडी (क्रमांक एम एच १६ एच ९६५६) कोणीतरी अज्ञात चोरट्याने गाडीचे लॉक खोलून चोरून नेली. ही घटना सावेडी परिसरातील पाईपलाईन रोडवरील डोकेनगर येथे घडली. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी राहुल रमेश नरवडे (वय ३०, राहणार प्लॉट नंबर ११०, डोकेनगर, पाईपलाईन रोड, मुळे एसटीडी जवळ, सावेडी अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब) अन्वये चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली. पुढील तपास पोलीस हवालदार गिरी गोसावी करीत आहे.

# पालक व विद्यार्थ्यांसाठी नगरमध्ये रविवारी करियर कौन्सलिंग प्रोग्रॅम!

नगर – येथील झा'स अकॅडमीतर्फे करियर काउंसलिंग प्रोग्रॅमचे आयोजन करण्यात आले आहे. २९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता मनमाड हायवेवरील हॉटेल संजयोग येथे हा प्रोग्रॅम होणार आहे. ९ वी, १० वी, ११ वी मधील विद्यार्थ्यांना १२ वी नंतर कशामध्ये करियर करावे, भविष्यातील करियरच्या नवनवीन संधी तसेच NEET, NDA, JEE व CET परीक्षा संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

लातूर फॅकल्टीचे शिक्षक तसेच ३० वर्षांचा करियर कौन्सलिंगचा अनुभव असलेले डॉ. रवी अगरवाल हे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार असून यातून विद्यार्थ्यांना आपल्या भविष्याच्या वाटा निश्चित करता येणार आहेत. तसेच या कार्यक्रमामध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशिपही प्रदान करण्यात येणार आहे, त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थी व पालकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन अकॅडमीतर्फे करण्यात आले आहे.




मोहम्मदिया एज्युकेशन सोसायटी संचलित मुकुंदनगर येथील मौलाना आझाद उर्दु गर्लस हायस्कूल चा वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थिनी.

# सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांची आवड निवडचा अंदाज येतो : प्रा.सलाम

नगर – विद्यालयातील विद्यार्थी वर्षभर मोठ्या आतुरतेने शाळेचे स्नेह संमेलनाची वाट पाहत असते. त्यांना याद्वारे आपल्या आवडीच्या गोष्टी स्नेहसंमेलनातील सांस्कृतिक कार्यक्रमात सादर करता येते. यामुळे पालकांना व शिक्षकांनाही विद्यार्थ्यांच्या आवड निवडचा अंदाज येतो. व मुलांवर संस्कार करुन त्यांचे भविष्य घडवण्याचे कार्य शिक्षक करतात. लहान वयात मुलांच्या पाया रचला जातो. आजची मुले उद्याचे भविष्य आहे. त्यांच्यावर चांगले संस्कार झाल्यास सक्षम समाज घडणार आहे.असे प्रतिपादन मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह डॉ.प्रा. अब्दुस सलाम सर यांनी केले.

मोहम्मदिया एज्युकेशन सोसायटी संचलित मुकुंदनगर येथील मौलाना आझाद उर्दु गर्लस हायस्कूल चा वार्षिक स्नेहसंमेलन माऊली संकुल येथे झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रा. अब्दुस सलाम सर, शेख लाला, उपसचिव अजीज जनाब, विश्वस्त नसीर शेख, शरफुद्दीन शेख, सलीम शेख ,रशिद शेख,हसीब शेख, मतीन शेख, फरीदा भाभी, शबाना आपा, मुख्याध्यापिका फरहाना सय्यद, मुख्याध्यापक नौशाद सैय्यद, महेनाज बाजी, असलम पटेल, फरीदा जहागिरदार आदी उपस्थित होते.

यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना विद्यार्थ्यांनी संविधानामध्ये समाजाच्या हक्कासाठी असणाऱ्या बाबींचा उल्लेख संविधान जागर नाटकातून सांगितले. मंगल पांडे यांच्या फाशीची संपूर्ण माहिती ही नाटक द्वारे देण्यात आली. तसेच भारताच्या प्राचीन इतिहास ही नाटकातून सांगण्यात आला. या व्यतिरिक्त मुशायरा, कव्वाली, कोळी डान्स, पाण्याचे महत्व, झाडांचे महत्त्व व अशा अनेक शैक्षणिक साहित्यिक व सामाजिक विषयांची नाटके सादर करून पालक व विद्यार्थींया मध्ये जनजागृती करण्यात आली. आपल्या मुलांमधील कलागुणांना पाहून पालकांनीही त्यांना भरभरून प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन बहार अंजूम यांनी केले. तर आभार अंजुम खान यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नाजेमा जुल्फेकार, नाहीद, रफत, नाजेमा इकबाल, अफशा, मिनाज शेख, खुतेजा बाजी, सदफ, मलेका बाजी, सिदरा, यास्मिन शेख आदी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी भरपूर परिश्रम घेतले.

# मुलांपुढे आदर्श निर्माण करण्यासाठी पालकांनीच मोबाईलचा नाद सोडावा

## आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शाळांचे स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करताना अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे.

नगर – मोबाईलच्या अती वापरामुळे मोबाईल शाप की वरदान असा प्रश्न उभा राहिला आहे. पालक रोज तासंतास मोबाईल पाहतात, त्याचा चांगला तर नाहीच पण किती दुष्परिणाम होत असेल याचा कधी तुम्ही विचार केला आहे का ? त्यामुळे मुलांपुढे आदर्श निर्माण करण्यासाठी पालकांनी मोबाईलचा नाद सोडून कमीतकमी व कामापुरताच वापर करावा. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात यशस्वी होण्यासाठी हारजीतचा विचार न करता प्रत्येक स्पर्धेत भाग घ्यावा. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची क्षमता तुमच्यात आल्यावर तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल, असे प्रतिपादन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संचलित प्रगत विद्यालयाच्या स्नेहसंमेलनातील सांस्कृतिक कार्यक्रम रंगला

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संचलित वि.ल.कुलकर्णी प्राथमिक शाळा तसेच प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते सरस्वती देवीच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी प्रमुख पाहुणे ज्येष्ठ रंगकर्मी प्रा.स्नेहा रानाडे, शाळेचे माजी विद्यार्थी सीए. अमित पोखरण व सीए.सोनम मुनोत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजया रेखी होत्या. यावेळी उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, सेक्रेटरी किरण वैकर, खजिनदार उमेश रेखे, सदस्य महेश रेखे, दि.ना.जोशी, उदय भणगे, उमेश नगरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील पंडित, मुख्याध्यापिका प्रतिभा धरम व पूर्व माध्यमिक विभाग प्रमुख अनुराधा जोशी आदींसह सर्व शिक्षक विद्यार्थी, पालक उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका प्रतिभा धरम यांचा सेवानिवृत्ती बद्दल सन्मान करणात आला

यावेळी शाळेतील बालवाडी ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यात चिमुरड्यांनी सादर केलेले किलबिल किलबिल पक्षि बोलती..., विठूचा गजर, बाल शिवाजी महाराजांचा पाळणा, रामायण, देशभक्ती आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नृत्य करून पालकांची दाद मिळवली. तसच वृद्धाश्रम नाटिकेच्या सादरीकरणाने प्रेक्षकांचे डोळे पाणावले. विठूचा गजर करत विद्यार्थ्यांनी केलेल्या रिंगणात पांडुरंगही नाचला. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलेला सांस्कृतिक कार्यक्रम रंगला.

यावेळी प्रा.स्नेह रानडे म्हणल्या, विद्यार्थ्यांनी कोणत्याही कामाला न लाजता आत्मविश्वासाने व मन ओतून केल्यास यश मिळतेच, असे सांगून जगज्ञेता बुद्धिबळपटू गुकेशचे उदाहरण दिले. शाळेचे माजी विद्यार्थी सीए. अमित पोखरण व सी.सोनम मुनोत यांनी शाळेतून मिळालेल्या पाठबळामुळेच सिए होऊ शकल्याचे सांगून शाळेचे आभार मानले.

विजया रेखे यांनी संस्थेच्या स्वतःच्या नव्या इमारतीचे काम लवकरच सुरु होणार असल्यानेया कामास सर्व माजी विद्यार्थी व पालकांनी मदत करावी, असे आवाहन केले.

प्रास्ताविकात प्राचार्य सुनील पंडित यांनी शाळांच्या प्रगतीचा आढावा घेत जेईई, आयआयटी, निट सारख्या महत्त्वाच्या परिक्षांमध्ये शाळेतील विद्यार्थी विशेष नैपुण्य मिळवत आहेत. अभ्यासा बरोबरच कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थी चमकत आहेत.

# दुष्काळी पट्टयात काळी आई अक्षय ओल अमृतकुंभ आणि काळी आई धनराई योजनेचा प्रस्ताव

नगर – शेतकऱ्यांची दुष्काळी परिस्थिती कायमची संपविण्यासाठी पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने क्रांतिकारक रेनगेन बॅटरी तंत्राचा आग्रह शेतकऱ्यांकडे धरला आहे. नान्नज दुमाला येथील ज्येष्ठ शेतकरी बाबुराव गवळी यांना अभिवादन करुन संगमनेरच्या दुष्काळी पट्टयात काळी आई अक्षय ओल अमृतकुंभ आणि काळी आई धनराई अशा योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

१९७२ च्या अगोदर चार बैलांच्या मदतीने ३० एकर जमीन कसून आर्थिक स्थिती मजबूत ठेवलेले शेतकरी बाबुराव दामू गवळी यांनी १९७२ च्या दुष्काळापासून ५२ वर्षे दुष्काळवास सहन केला. या दुष्काळामुळे संपूर्ण कुटुंब आणि शेती सर्वच बाबतीत अडचणी येऊन त्यांचे निधन झाले. निसर्ग आणि सरकारच्या लहरीपणामुळे लक्ष्यावधी शेतकऱ्यांचा दुष्काळी वनवास संपलेला नाही. म्हणून रेनगेन बॅटरी तंत्राचा प्रचार-प्रसार संघटनेने सुरु केला आहे.

९० टक्के पावसाचे पाणी वाहून जाण्यामुळे किंवा ऊन, वाऱ्यामुळे झालेले बाष्पीभवन शेतीसाठी उपयुक्त ठरत नाही. त्यात पावसाने उशीर केला तर जमिनीतील ओल संपून जाते आणि शेतकरी दुष्काळाच्या खाईत पडतो. त्यामुळे तमाम शेतकऱ्यांनी निसर्गाशी भागीदारी करुन पावसाचे पाणी जमिनीखाली मुरूमात साठवून ठेवण्याची यंत्रणा असलेल्या रेनगेन बॅटरी तंत्राचा स्विकार करण्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

पूर्वी मोठ्या प्रमाणात झाडाझुडपांच्या मुळाद्वारे पाणी जमिनीत मुरत होते. परंतु मोठी वृक्षतोड झाल्यामुळे निसर्गाच्या पाणी साठविण्याची क्षमता संपुष्टात आली आहे. त्यातून वाळवंटासारखी परिस्थिती निर्माण होत आहे. या तंत्राच्या माध्यमातून जमिनीत उताराच्या बाजूला वीस फूट लांब, तीन फूट रुंद आणि आठ फूट खोल खड्डे करून त्यामध्ये दगड गोटे वरपर्यंत भरायचे आणि वरच्या बाजूला सहा इंचचा जाड मुरूम पसरावयाचा आहे. पावसाचे पाणी अशा खड्ड्यात सोडले तर पुढच्या २४ तासात जमिनीखाली मोठा ओलावा तयार होतो. पावसाचे पाणी वाहून जाणे किंवा त्याचे बाष्पीभवन होण्याचे प्रमाण ९० टक्के पर्यंत थांबते. चार-दोन पावसात त्या जमिनीला वर्षभर किमान ओळावा टिकू शकतो, त्यातून फळबागा नक्की जगू शकणार आहे आणि दुष्काळ कायमचा संपवता येणार आहे. यापुढे शेतकऱ्यांना सरकार किंवा निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून न राहता हंगामी शेती बागायतीचा भाग म्हणून करता येणार आहे. सर्व शेतकऱ्यांनी काळी आई अक्षय ओल अमृतकुंभ आणि काळी आई धनराई योजना राबविण्याचे आवाहन संघटनेने केले आहे.

ज्ञानेश्वर माऊलींनी जलाशये निर्मावी, महावने लावावी असा आदेश मानव जातीला ज्ञानेश्वरीतील एका ओळीने दिला आहे. हा आदेश निसर्गाचा परमेश्वरी आदेश असून, याची जाण शेतकऱ्यांनी ठेवली पाहिजे. महाराष्ट्रात दुष्काळवास संपवता येणार आहे. नान्नज दुमाला येथील विनायक गुंजाळ या शेतकऱ्याच्या ३५ एकर जमिनीवर काळी आई अक्षय ओल अमृतकुंभ आणि काळी आई धनराई योजना राबविण्यात येणार आहे. ज्ञानेश्वरीचे पूजन करून रेन गेन बॅटरी बसविण्यात येणार असून, यावेळी संपूर्ण पंचक्रोशीतील शेतकरी या उपक्रमात सहभागी होणार असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

